

# भारतीय अर्थ – राजकारण
## २०१४ – २४
## भविष्याची दिशा

डॉ. श्रीनिवास खांदेवाले
डॉ. धीरज कदम



# भारतीय अर्थ-राजकारण
# २०१४-२४ : भविष्याची दिशा

डॉ. श्रीनिवास खांदेवाले
डॉ. धीरज कदम

**भारतीय अर्थ-राजकारण २०१४-२४ : भविष्याची दिशा**
डॉ. श्रीनिवास खांदेवाले
(भ्रमणध्वनी : ७४४७५६१५४४)

डॉ. धीरज कदम
(भ्रमणध्वनी : ९९२२२८१५४१)

**मुखपृष्ठ :** रुचा पाटील

**किंमत :** रु. १००/-

**प्रकाशक :**
दादा पुरव रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इन्स्टिटयूट,
सुवास्तू प्रेस्टिज, सर्व्हिस रोड,
आर.एम.डी. इन्स्टिटयूटच्या मागे,
आदित्य गार्डन सिटीजवळ,
वारजे, पुणे - ४११०५८

**मुद्रणस्थळ :**
अंजूम बाइंडिंग वर्क्स, शिवडी (पू.),
मुंबई -४०००१५.

# प्रकाशकांचे दोन शब्द

अर्थतज्ञ डॉ. श्रीनिवास खांदेवाले व त्यांचे सहलेखक डॉ. धीरज कदम यांनी लिहिलेले 'भारतीय अर्थ - राजकारण २०१४ - २०२४ भविष्याची दिशा' हे पुस्तक दादा पुरव रिसर्च आणि ट्रेनिंग इन्स्टिटयूटच्या माध्यमातून वाचकांच्या हाती देताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे.

अन्नपूर्णा परिवाराला यंदा ३१ वर्ष पूर्ण झाली. दादा पुरव रिसर्च सेंटरला यावर्षी सोळा वर्षे पूर्ण झाली. दरवर्षी १८ ऑगस्ट हा कॉम्रेड दादांचा स्मृतिदिन आम्ही 'फाऊंडर्स डे' म्हणून साजरा करतो. व यानिमित्त एका पुस्तकाचे प्रकाशन करतो. गेल्या पंधरा वर्षात विविध विषयावर आम्ही पुस्तके प्रकाशित केली आहेत. त्यापैकी लघुवित्त, लघुविमा यावर तर बरेच लिखाण प्रकाशित केले आहे. परंतु समाजातील विविध घडणाऱ्या घटनांनुसार कधी महाराष्ट्राची, देशाची व जागतिक अर्थव्यवस्था यावरही लिखाण प्रकाशित केले आहे. कधी बँकिंग व्यवसाय व त्यांचे भवितव्य याविषयी पुस्तक प्रकाशित केले आहे. कोरोनाच्या कालावधीत कोरोनाबद्दल पुस्तक प्रकाशित केले आहे. तसेच धर्म आणि संविधान यावरही पुस्तक प्रकाशित केले आहे. गांधीजींवर तसेच संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनावरही लिखाण प्रकाशित केले आहे. यापैकी बहुतांश पुस्तकांचे भाषांतर पुस्तक प्रकाशित झाल्यानंतर पुढल्या वर्षीच्या जानेवारीमध्ये केले जाते. मराठी आणि इंग्लिश अशा दोन्ही भाषांमध्ये पुस्तके छापून वितरित केली जातात. तसेच आमच्या वेबसाईटवर सुद्धा आमची सर्व पुस्तके वाचकांसाठी उपलब्ध करून दिली जातात.

मुख्यत: अन्नपूर्णा परिवाराचे कार्य समाजाच्या तळागाळातील वर्गाला सक्षम करण्याचे आहे. त्यामुळे आमच्यासाठी आपल्या देशातील अर्थ धोरणे, राजकीय धोरणे यांचा परिणाम आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांवर होतो, ती फारच महत्त्वाची असतात. गेल्या दहा वर्षातील आपल्या देशातील अर्थकारण, राजकारण हे इतके बदलले आहे की, एका बाजूला ८० कोटी जनता

सरकारकडून दरमहा मिळणारे मोफत धान्य खाऊन अर्धपोटी जगू लागली आहे. तर दुसऱ्या बाजूला जागतिक श्रीमंतांच्या यादीत आपल्या देशातील श्रीमंतांचे क्रमांक वर वर जात आहेत.

देशाच्या जीडीपी, सेन्सेक्स याची चर्चा कानठळ्या बसतील इतकी उच्च स्वरात होताना जाणवते. पण त्याचवेळी शेतकरी, विद्यार्थी आत्महत्याचे प्रमाण आकाशाला भिडते आहे. अल्पसंख्यांकांवरचे अत्याचार, महिला-मुलींवर बलात्कार याबद्दल बोलणेच खुंटते आहे. या परिस्थितीमुळे आमच्या संपादक मंडळाला असे वाटले की, मागील दहा वर्षातील अर्थकारण, राजकारण याचा परिणाम समाजावर कसा होत आहे यावर अभ्यासपूर्ण अशा एका पुस्तकाची निर्मिती आपण यंदाच्या 'फाऊंडर्स डे'ला करावी .

ह्या विषयाला न्याय देऊ शकणारे डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांच्या इतके सुयोग्य लेखक आम्हाला आनंदाने 'हो' म्हणाले हे या पुस्तकाचे भाग्यच! त्यांचे सहलेखक डॉ. धीरज कदम यांच्यासह डॉ. खांदेवाले यांचे शतश: आभार!

सोप्या शब्दात कमी आकाराची, सुटसुटीत अशी ही पुस्तिका 'न्यू एज प्रिंटिंग प्रेस'च्या टीमने उत्कृष्ट सहकार्य दिल्यामुळे आम्ही वेळेवर आपल्या हाती देऊ शकलो. संपादक मंडळातर्फे प्राची बापट हिने पुस्तकाचे निर्मिती कार्य पार पाडले.

आता वाचकांनी ठरवावे या पुस्तिकेच्या वाचनाने त्यांच्या ज्ञानात, माहिती आणि अस्वस्थतेत किती भर पडते.

**– डॉ. मेधा पुरव सामंत**
सीएमडी, अन्नपूर्णा परिवार

# १

# विषयाचे स्वरूप

महागाई आणि बेरोजगारी हे दोन मुद्दे संपूर्ण समाजाच्या आर्थिक व्यवहारांचा आणि विशेषकरून श्रमिक जीवनाशी संबंधित आर्थिक व्यवहारांचा गाभा आहे. एखाद्या देशातला, प्रदेशातला मानवी समाज आर्थिकदृष्ट्या कसा जगतो; त्यासाठीच्या आवश्यक संस्था कशा निर्माण करतो आणि संघटितरीत्या आपली सर्वांगीण प्रगती कशी करून घेतो याला वर्तणुकीचे शास्त्र (Behavioural Science) असे म्हणतात. त्यात अनेक प्रकारच्या शास्त्रांपैकी अर्थशास्त्र हे प्रमुख आहे, कारण मनुष्याच्या पोट भरण्याच्या व्यवहारांचा तो अभ्यास आहे. विशिष्ट काळामध्ये विशिष्ट देशांमध्ये निर्माण झालेले प्रश्न त्या लोकांनी कसे सोडविले किंवा कसे सोडविले नाहीत यावरून त्या समाजाचे वर्तन दिसून येते. घटना घडून गेल्यानंतर त्या इतिहासाचा एक भाग बनतात, म्हणून आर्थिक व्यवहारांच्या अभ्यासाची साधने म्हणून राज्यशास्त्र, कायदा, समाजशास्त्र, संस्कृती इ. शास्त्रे एकमेकांशी मेळ घालून पुढे जातात. बरेच वेळा सामाजिक प्रगतीच्या प्रक्रियेत असे टप्पे येतात की त्यावर उपाययोजना करताना मानवी समाज मोठ्या घटनांना सामोरा जात असतो. आज भारतात आणि जगात तशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. औद्योगिक प्रगतीच्या टप्प्यांमध्ये संगणक, यंत्रमानव, अंतराळ संशोधन इत्यादींच्या आधारे जसे भविष्यातील प्रगतीचे धूसर मानचित्र दिसते, त्याचबरोबर त्या सगळ्या प्रक्रियेत जे मानवी प्रश्न उपस्थित होत आहेत, त्यांच्यामुळे विचार करणारे सगळेच (शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, धर्मज्ञ, सामान्यजन इत्यादी) बुचकळ्यात पडल्यासारखे दिसत आहेत. अनेक जण ह्या तांत्रिक बदलांमधून काय घडेल याचे आपापल्या परीने वर्णन व विश्लेषण करतात, परंतु बऱ्याच प्रमाणात सहा आंधळ्यांनी अल्प-अनुभवाच्या आधारे हत्तीचे वर्णन करावे; तसे घडताना दिसत

आहे. तेव्हा हे सगळे घडत असताना त्या प्रक्रियेचे अर्थशास्त्र काय आहे; कोणाला लाभ आहे; कोणाला हानी आहे; हे प्रश्न समजून घेतल्याशिवाय आणि सोडविल्याशिवाय ते तंत्रज्ञान खूप चांगले, आश्चर्यकारक आहे वगैरे म्हणणे अपुरे आहे. या संपूर्ण प्रश्नाचा मूलभूत आणि गांभीर्याने विचार केल्याशिवाय मार्ग सापडत नाही आणि त्यात महत्त्वाचा वाटाड्या म्हणजे मार्क्सचा विचार होय.

इ. स. १७६० ते १८५० पर्यंत इंग्लंडमध्ये हाताच्या उत्पादनाऐवजी यंत्राच्या साहाय्याने उत्पादन सुरू झाले आणि ती यांत्रिक क्रांती युरोपभर पसरली व जगाला एक मोठे आश्चर्य वाटू लागले. (पाहा- Engels, इ. (१८९२). The condition of the working class in England in १८४४. Martino Publishing.). या औद्योगिक क्रांतीत श्रमिकांची काय दैना झाली ती इंग्लंड, युरोप आणि सर्व जगाने पाहिली. त्या जलदगती उद्योगांना तितक्याच जलदगतीने स्वदेशातून किंवा वसाहतींमधून कच्चा माल हवा होता आणि विक्री करण्यासाठी बाजार हवा होता, तसे झाले तरच त्यातून नफा मिळेल आणि म्हणून जगभरच्या देशांना वसाहती बनवून, त्यांच शोषण करणारा साम्राज्यवादही त्यातून निर्माण झाला. इंग्लंडच्या पाठोपाठ फ्रान्स, जर्मनी, स्पेन, हॉलंड, पोर्तुगाल इ. सर्वच युरोपियन देशांनी आशिया आणि आफ्रिका खंडांकडे वळून त्या वसाहतींचे जलदगती नफ्यासाठी शोषण सुरू केले. त्या शोषण प्रक्रियेत अंतिमत: सगळ्या वसाहती देशांमधील उत्पादन संसाधने आणि श्रमिक यांचे शोषण झाले.

या घटनांचा मार्क्स, एंगल्स, लेनिन यांनी अभ्यास करताना असा निष्कर्ष काढला की, तत्कालीन औद्योगिक भांडवलशाहीच्या प्रगतीसाठी सगळ्या जगातील श्रमिकांना अमानवीय असे शोषण सहन करावे लागले. कामाचे प्रदीर्घ तास, आरोग्य आणि भरण-पोषणाचा अति-निम्न स्तर यामुळे अकाली वृद्धत्व आणि अकाली मृत्यू हे सामान्य चित्र होते. म्हणून कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एंगल्स यांनी १८४८ मध्ये या शोषणावर उपाय काय ते सुचविण्यासाठी ‘द कम्युनिस्ट मेनिफेस्टो’ (The Communist Manifesto) ही पुस्तिका लिहिली आणि जागतिक समाजवादाची गरज आणि अनिवार्यता प्रतिपादित केली. त्यांच्या लिखाणावरून अनेक अभ्यासकांचा असा समज झाला की श्रमिकांनी मागणी केल्याबरोबर समाजवाद येईल, परंतु प्रत्यक्षात भांडवलशाही टिकून राहावी म्हणून व समाजवाद येऊ नये यासाठी तितक्याच चिकाटीने व ताकदीने भांडवलदार वर्ग श्रमिक वर्गाशी संघर्ष करतो राज्य ह्या संस्थेवर दबाव टाकतो धर्म आणि संस्कृती यांचा

आपल्या नफ्यासाठी उपयोग करून घेतो अशा स्थितीत भांडवलवाद हा, काही शतकांपर्यंत चालूच राहतो आणि श्रमिक वर्गाला उत्पादन व्यवस्थेद्वारा त्याच्याशी संघर्ष करावाच लागतो, त्यामुळे ती एक मंदगती प्रक्रिया आहे. अनेक देशांमध्ये तेथील प्राप्त परिस्थितीत भांडवल आणि श्रम या घटकांच्या संघर्षातून समाजवाद निर्माण झाला तरी भांडवलदार वर्ग विविध स्वरूपात त्या समाजवादाशी लढतच राहतो. म्हणून तंत्रज्ञान, उत्पादन व्यवस्था, राज्यप्रणाली आणि भांडवलदार व श्रमिक वर्ग या सगळ्यांचा महासंगर सुरूच राहतो, असा आजवरचा अनुभव आहे.

यांत्रिकी क्रांतीनंतरची महत्त्वाची क्रांती २०व्या शतकाच्या उत्तरार्धात संगणकीकरणामुळे निर्माण झाली आणि २१व्या शतकात त्या संघर्षात कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्र हे दाखल झाले आहे. याकरिता असे म्हणावे लागेल की आज पुन्हा नव्या संदर्भात समाजवादाचे अधिष्ठान समजून देण्यासाठी मार्क्स आणि एंगल्ससारख्या महान व्यावहारिक तत्त्वज्ञांची आवश्यकता आहे. असे दिसते की प्रत्येक तांत्रिक क्रांतीमुळे श्रमिक वर्गाची स्थिती खालावत जाते परंतु श्रमिक वर्ग स्वत:च्या अनुभवातून शिकला आहे की, भांडवलशाही व्यवस्था त्यांना न्याय देऊ शकत नाही आणि मार्क्स व एंगल्स यांनी सांगितले की संघर्षाशिवाय गत्यंतर नाही, अशा स्थितीत आज आपण सगळे आहोत. रॉबर्ट हाईलब्रोनर या अमेरिकन समाजवादी अर्थशास्त्रज्ञाने त्याच्या 'द वर्ल्डली फिलॉसॉफर्स' (The Worldly Philosophers) या ग्रंथात उद्योगपतींना असे म्हटले की, 'तुम्ही जे म्हणता की श्रमिकांना पगारवाढ, बोनस इत्यादी सवलती तुम्ही देता; त्या खरोखरीच बंद करून टाका म्हणजे तुम्हाला दिसेल की दुसऱ्याच दिवशी मार्क्स तुमच्या दाराशी उभा आहे!' (Heilbroner, R. L. (१९५३). The Worldly Philosophers: The Lives, Times and Ideas of the Great Economic Thinkers. New York, NY: Simon & Schuster. Reprinted by Penguin Books Ltd, 2000.)

आज प्रचंड अशा तांत्रिक बदलांमुळे उत्पादन वाढ झपाट्याने होत आहे आणि होण्याची संभावनाही आहे. त्याच वेगाने नफा मिळवायचा असेल तर १८-१९व्या शतकाप्रमाणे श्रमिकांची मजुरी, त्यांचा रोजगार, उत्पन्न हे खालच्या स्तरावर दाबून ठेवल्याशिवाय नफा वाढणार नाही. तो वाढलेला नफा आज जगातील बहुतेक देशांमध्ये (त्यात दक्षिण आफ्रिका वगळल्यास भारताचा प्रथम क्रमांक लागतो.) अधिक वाढताना दिसून येत आहे. त्याचे दृश्यस्वरूप म्हणजे अतोनात वाढलेल्या उत्पन्न विषमता ह्या होत. मग या सगळ्यांचा आपल्या प्रस्तुत विषयाशी काय संबंध आहे, असा प्रश्न निर्माण होऊ शकतो. परंतु

२०१४ ते २४ ह्या कालखंडातील आर्थिक व राजकीय बदलांचे विश्लेषण केल्यास असे दिसून येईल की, पुढारलेले तंत्रज्ञान म्हणजेच जलदगती उत्पादन व्यवस्था म्हणजेच श्रमिकांचे वाढीव शोषण आणि अतोनात वाढलेली उत्पन्न विषमता! त्याच प्रक्रियेचे राजकारण आणि समाजकारण होत असताना दिसत आहे.

वर निवेदित केलेल्या विचारांवर आपण आधी २०१४ पूर्वीच्या दशकामध्ये काय घडले त्याचा परिपाक म्हणून २०१४-२४ दरम्यान काय घडले यांचे विश्लेषण करून पलीकडल्या काळात अर्थव्यवस्थेचे व राज्यव्यवस्थेचे स्वरूप काय असू शकते, याचा आढावा घेणार आहोत.

❖ ❖ ❖

# २
# महागाई व बेरोजगारी यांचे स्वरूप

**महागाई**

२०२४ व त्याच्या आधीची काही वर्षे महागाई मोठ्या प्रमाणावर होती. मात्र २०२४ मध्ये रिझर्व्ह बँक आणि केंद्र सरकार यांनी संयुक्तपणे बाजारात उपलब्ध होणारा कर्जपुरवठा आणि विकास कामांवरील खर्च मर्यादित करून महागाई थोडीशी आटोक्यात आणली आहे. परंतु ती तशीच नियंत्रणात राहील याची खात्री नाही. म्हणून आपण महागाई व त्याची समकक्ष संकल्पना मंदी आणि त्या दोन्ही स्थितींचा संयुक्त परिणाम असलेली मंदीसह-स्फीती (Stagflation) या तिन्हींचा थोडक्यात परिचय करून घेऊ.

महागाई किंवा किंमतवाढ या परिस्थितीत, काही कारणास्तव नेहमीच्या पुरवठ्यापेक्षा पुरवठा कमी असणे नेहमीच्या मागणीपेक्षा मागणी जास्त असल्यास सामान्य किमतींपेक्षा किमती जास्त वाढतात. शेती हंगामासारख्या पुरवठ्यावर तात्पुरता प्रभाव पाडणाऱ्या घटकांमुळे अल्पकालीन भाववाढ होते. तर युद्ध, हवामान बदल इ. कारणांमुळे होणारी भाववाढ ही दीर्घकालीन असते कारण पुरवठा सातत्याने कमी राहतो.

महागाईचे परिणाम विविध घटकांवर कसे होतात ह्याचा विचार करताना असे दिसते की, कायद्याने महागाईविरुद्ध ज्यांना, महागाई भत्त्याच्या स्वरूपात संरक्षण आहे, अशांचे फारसे नुकसान होत नाही. तसेच व्यापारी आणि उद्योजक त्यांच्याकडे आलेले महागाईचे घटक वाढत्या किमतींच्या रूपाने उपभोक्त्यांकडे सरकवून देतात, म्हणून त्यांच्यावरही फारसा प्रतिकूल परिणाम होत नाही. मात्र शेतकरी, शेतमजूर, कारागीर, वनांच्या आधारावर जगणारे आदिवासी इत्यादींना महागाईमुळे रोजगार कमी मिळतो आणि त्यांच्या उत्पन्नात महागाईच्या प्रमाणात वाढ होत नाही. आजच्या परिस्थितीत रोजगार

हमी मजुरांची अशी स्थिती आहे की बाजारात किमती वाढत आहेत; परंतु त्याच्या मजुरीत मात्र वाढ होत नाही. उत्पादक वर्ग नफ्याची अनिश्चितता असेल तर उत्पादन कमी करतो आणि काही मजुरांना कामावरून काढून टाकतो. त्यामुळे उच्च उत्पन्न वर्ग, उच्च-मध्यम वर्ग हे वगळल्यास मध्यम-मध्यम वर्ग, कनिष्ठ-मध्यम वर्ग आणि तळागाळातील मजूर हे महागाईने त्रस्त होतात. त्याचे मानवीय परिणाम असे होतात की न वाढणारे उत्पन्न आणि वाढणाऱ्या किमती यांच्यापासून कुटुंबांचा बचाव करण्यासाठी त्यांना अन्न-धान्य व पोषण, औषधी व्यवस्था, शिक्षण, राहणीमानाचे इतर घटक या सर्वांवरच कमी खर्च करावा लागतो, म्हणून महागाई ही बहुतांश जनतेकरिता बेरोजगारी, घटणारे उत्पन्न आणि अवरुद्ध राहणीमान दर्शविते. आज आपल्याला सध्याच्या परिस्थितीत यापैकी बरेच घटक समाज-जीवनात पाहावयास मिळतात. विशेषत: हवामान बदलामुळे पर्जन्यमानात जी कमालीची अस्थिरता निर्माण झाली आहे, त्याचा तेवढाच विपरीत परिणाम कृषी उत्पादनावर होत आहे. म्हणून आजच्या स्थितीत अन्नधान्याची दीर्घकालीन अनिश्चितता व भाववाढ आणि नवीन तंत्रज्ञानामुळे तंत्रशिक्षित श्रमिकांचा रोजगारसुद्धा बाधित होत आहे. त्यावर मलमपट्टी म्हणून समाजातील वेगवेगळ्या घटकांना मोफत अन्न, मासिक उत्पन्न वगैरे देण्याचा प्रयत्न सरकार करत आहे (पाहा- महाराष्ट्र सरकारचा अतिरिक्त अर्थसंकल्प, २९ जून २०२४).

महागाईची समकक्ष संकल्पना मंदी ही आहे. विविध कारणांनी नेहमीपेक्षा मागणी कमी होणे किंवा पुरवठा अति वाढणे यांच्यामुळे किमती कमी होतात. उत्तम पर्जन्यमान आणि उत्तम हवामान यामुळे शेतीचे उत्पादन एखाद्या वर्षी विक्रमी वाढू शकते व ते विकण्याकरिता किमती कमी कराव्या लागतात; म्हणून उपभोक्ता आनंदी असतो व शेतकरी नाराज असतो. औद्योगिक क्षेत्रात काही कारणास्तव मागणी कमी झाली किंवा उत्पादन खूप वाढविले गेले तरी किमती कमी होतात; त्या अल्पकालासाठीसुद्धा असू शकतात किंवा दीर्घकालासाठी-सुद्धा! पण किमती अल्पकालाकरिता कमी होवोत की दीर्घकालाकरिता, उत्पादक वर्ग उत्पादन (पुरवठा) घटवून मागणीशी संतुलन साधण्याचा प्रयत्न करतो. जसे, १९१४ ते १९१८ दरम्यानचे पहिले व १९३९-४५चे दुसरे जागतिक युद्ध संपल्यानंतर युद्धाकाळातील मागणी एकदम कमी झाली, सैन्यातून सर्व जास्तीच्या जवानांना बरखास्त केले गेल्यामुळे बाजारात मोठ्या प्रमाणावर मंदी आली होती व ती दीर्घकाळ टिकली होती. ह्या मंदीत उत्पादन घटविल्यामुळे रोजगारही कमी झाला होता. परिणामी मंदी म्हणजे बेरोजगारी, उत्पन्नाचा ऱ्हास आणि पुन्हा सामान्यजनांचे भरण-पोषण, आरोग्य, शिक्षण

या सगळ्यांवर प्रतिकूल परिणाम घडवून आणणारी, ती क्लेशकारक स्थिती आहे. पहिले महायुद्ध १९१८ मध्ये संपल्यानंतर आणि मागणी अचानक घटल्याबरोबर मंदी यायला सुरुवात झाली. सरकारने प्रत्येक वेळी मंदी हटवण्याचे काही कार्यक्रम हाती घेतले. अमेरिकेचा इतिहास दर्शवितो की, १९२१-२९ पर्यंत ६ ते ७ वेळा अल्पकालीन मंदी आली होती आणि १९२९ मध्ये तिचे रूपांतर दीर्घकालीन मंदीमध्ये झाले. त्या मंदीचा शेतीवरील एक प्रभाव म्हणजे बाजारातील किमतीपेक्षा उत्पादन खर्च जास्त असल्यामुळे शेतकरी माल विकू शकले नाही आणि अनेक ठिकाणी त्यांनी माल जाळून टाकला. आजही भारतात उत्पादन खर्चापेक्षा बाजार किमती कमी आहेत म्हणून शेतकरी कर्जे परत करू शकत नाहीत आणि त्यांना आत्महत्या करावी लागते; हे (विदर्भातील उदाहरणाने) डोळ्यादेखतचे सत्य आहे. त्याचप्रमाणे पंजाब, हरयाणा, राजस्थान, उत्तर प्रदेश येथील शेतकऱ्यांच्या नेतृत्वात अखिल भारतीय 'किमान आधारभूत किमती'चे आंदोलन सुरू आहे. महाराष्ट्र राज्याच्या वार्षिक आर्थिक सर्वेक्षणानुसार (२७ जून, २०२४) महाराष्ट्रातील कृषी उत्पादनाचा वृद्धीदर घसरला आहे. राज्याच्या सरासरीपेक्षा कोरडवाहू प्रदेशांमध्ये ही घसरण जास्त आहे व त्याचे आर्थिक परिणामही भीषण दिसून येतात. सारांश असा की महागाई आणि मंदी या दोन्हींचे प्रतिकूल आर्थिक परिणाम बहुतांश अल्प व मध्यम उत्पन्न असलेल्या लोकांवरच जास्त होतात.

अनेकदा असे घडते की जागतिक स्पर्धेत मानाचे स्थान मिळावे म्हणून सरकार उत्पादन वाढीवर अत्याधिक भर देते आणि उद्योजक वर्गाचा नफा वाढेल म्हणून उद्योजक वर्गही सरकारच्या बरोबर सहयोगी बनतो. बेरोजगारी आणि नफा वृद्धी यांचा विसंगत संबंध कसा असतो तो एका दैनिकातील शेजारच्या दोन कॉलममध्ये बातम्यांची जी शीर्षके आहेत त्यावरून स्पष्ट होते- एक शीर्षक म्हणते 'नव्या रोजगारांना फटका' आणि शेजारचे शीर्षक म्हणते 'सेन्सेक्स जाणार का ८० हजारांच्या पार?' *(पाहा - लोकमत, नागपूर, १ जुलै, २०२३).*

## मंदीसह-भाववाढ (Stagflation)

महागाई नियंत्रण करणे काही कारणांस्तव सरकारला शक्य झाले नाही व उद्योजकांनाही शक्य झाले नाही तर महागाई सतत वाढत राहते, आणि अशा आकाशाला भिडणाऱ्या किमतींना मागणी राहणार नाही म्हणून उद्योजक उत्पादन घटवतात व उत्पादन वाढीचे पुढील बेत रद्द करतात. त्यामुळे वाढत्या किमतींमुळे वाढता नफा व वाढते उत्पादन या समीकरणाच्या पलीकडे

अर्थव्यवस्था जाते. अशा स्थितीत किमती उच्चच राहतात, परंतु उत्पादन वाढ (आणि प्रत्यक्ष उत्पादनसुद्धा) घटविल्यामुळे अर्थव्यवस्थेत बेरोजगारी, मंदी आणि महागाई यांचे विचित्र मिश्रण पाहावयास मिळते, त्याला मंदीसह-भाववाढ असे म्हणतात. अर्थातच त्याचे सगळे विपरीत परिणाम मध्यम आणि कनिष्ठ वर्गांवर होतात. अशी स्थिती अल्पकाळ असली तर ठीक, परंतु दीर्घकाळ असल्यास उद्योगपती त्यावर उपाय करू शकत नाहीत; आणि सरकारही परिस्थितीपुढे हतबल झाले असे जनतेला दिसल्यास त्याचे राजकीय परिणामसुद्धा होतात.

**बेरोजगारी**

बेरोजगारीचा विचार करताना असे दिसते की, यांत्रिकी उत्पादनाच्या आधी उत्पादन हाताने व पशु-शक्तीने केले जाई. त्या काळात उत्पादन जवळपास विकेंद्रित होते; त्यामुळे सोनार, शिंपी, सुतार, लोहार, विणकर इ. सगळ्यांचे उत्पादन कार्य घरोघरीच चालत असे. श्रमिक वर्ग परंपरेनेच श्रमिक बनत असे. त्यामुळे दुष्काळ, युद्ध अशा भयंकर घटना सोडल्यास लोकांना रोजगार मिळत असे आणि (उत्पादन × किमती =) राष्ट्रीय उत्पन्न जरी संथ गतीने वाढत होते, तरी निर्माण झालेल्या संपत्तीचा हिस्सा सर्वांना मिळत असे. बलुतेदारीचा एक फायदा असा दिसून येतो की ती पद्धती, निर्माण होणाऱ्या उत्पादनाचे ठरावीक दराने सर्व कारागिरांना, श्रमिकांना हिस्सा देणारी होती. त्यामुळे तेजी असेल तर सर्वांची तेजी आणि मंदी असेल तर सर्वांची मंदी; अशी स्थिती असे. अर्थशास्त्रज्ञ प्रभात पटनाईक यांनी 'Capatalist Poverty' (भांडवशाहीतील दारिद्र्य) ह्या त्यांच्या ताज्या लेखात असे म्हटले की भांडवलदार नफ्याच्या चढ-उताराबरोबर वाटेल तेव्हा रोजगाराची छाटणी करतो व हजारो श्रमिक उत्पादन व्यवस्थेमधून बाहेर फेकले जातात *(पाहा - The Hitvada, Nagpur ३० जून, २०२४).* रोजगाराची छाटणी करताना बेरोजगार श्रमिकांचे पुढे काय होईल याचा विचार करण्याची गरज भांडवली व्यवस्थेत त्यांची नसते. त्यामुळे ती जबाबदारी उद्योजक वर्ग शासनावर ढकलून देतात. महाराष्ट्रातील मुंबई आणि विदर्भातील ज्या कापड गिरण्या बंद झाल्या, त्यात लोकांनी हे अनुभवले आहे. जुन्या बलुतेदारीमध्ये तेजी आणि मंदी शेतमालक आणि बलुतेदार वाटून घेत असत, परंतु भांडवलशाहीमध्ये हजेरी पटावरून मजूर कमी केला की त्याचा आणि मालकाचा काहीच संबंध राहत नाही. पटनाईक पुढे म्हणतात की मजुरांना हेच कळत नाही की आपण बेरोजगार होण्यात आपला दोष काय आहे. त्याला महागाई आणि मंदी या कोणत्याही स्थितीत पर्यायी

रोजगार न मिळाल्यास, त्या परिस्थितीचा शिक्का तो स्वत:च्या माथी मारतो; आणि कुटुंबातील पलीकडच्या काळातील जबाबदाऱ्या पेलू न शकल्यामुळे त्याच्यावर मोठा मानसिक आघात होतो. मोघलांच्या काळात जमिनीचा सारासुद्धा येणाऱ्या पिकांच्या प्रमाणात बदलत असे पण ब्रिटिशांनी शेतसारा बांधून ठेवला आणि कोणत्याही आपत्तींनी पिके नाश पावली तरी शेतसारा तितकाच द्यावा लागे. म्हणून पराकोटीचे दारिद्र्य त्या काळी निर्माण झाले. याच कारणांनी भारत स्वतंत्र झाल्यानंतर शेतीसहित सर्व क्षेत्रांत गुंतवणूक करून नियोजित पद्धतीने गुंतवणूक वाढेल, असा प्रयत्न करण्यात आला. सारांश असा की उत्पादन व्यवस्थेचे जितके जास्त खासगीकरण आपण करू, तेवढा रोजगार किंवा बेरोजगारीचा अधिकार आपण खासगी क्षेत्राकडे ठेवू; याउलट सार्वजनिक क्षेत्र प्रतिकूल परिस्थितीमध्येदेखील रोजगाराची स्थिरता टिकवून ठेवते, आणि त्याबद्दलचे अधिकार संसद आणि सरकार यांच्याकडे असतात.

१९२९च्या जागतिक मंदी व बेरोजगारीने सर्व जगच जर्जर झाले होते. त्या पार्श्वभूमीवर केन्सने असे प्रतिपादन केले की प्रदीर्घ मंदी आणि बेरोजगारीच्या काळात श्रीमंत वर्ग उत्पन्नाच्या प्रमाणात खर्च करत नसल्यामुळे सगळ्यांना रोजगार देण्याइतकी मागणी अर्थव्यवस्थेत निर्माण होत नाही. त्यावर भांडवलशाही उपाय म्हणून केन्सने असे म्हटले की श्रीमंत वर्गाच्या कमी उपभोगामुळे देशाच्या एकूण खर्चात जेवढी घट पडत असेल ती शासकीय खर्चाने भरून काढावी, आणि त्यासाठी शासकीय कर्जे काढावीत (compensatory spending) असा उपाय सुचविला. मात्र दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात शासनाने कर्ज घेण्याच्या उपायाला 'भांडवलशाहीतील क्रांतिकारक उपाय' म्हणून स्वीकारले. तेजी असो की मंदी, जगभरच्या सरकारांनी श्रीमंतांवरचे कर न वाढवता त्याऐवजी सतत कर्जे काढण्याचा सपाटा लावला तो आज २०२४ पर्यंत चालूच आहे. त्याचा परिणाम म्हणून २०२४ मध्ये भांडवलशाहीतील सगळ्यात श्रीमंत राष्ट्र अमेरिकेचे, सरकारी कर्ज त्याच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या सव्वापट पर्यंत (१२४%) वाढले आहे. तीच स्थिती भारतासह अनेक देशांची झाली आहे. आता 'आंतरराष्ट्रीय मुद्रा निधी' (IMF) सर्वच राष्ट्रांना सार्वजनिक कर्ज कमी करण्याचे वारंवार आवाहन करत आहे. त्यामुळे केन्सला भांडवलशाहीचे क्रांतिकारक अर्थशास्त्र लिहिल्याचे जे श्रेय दिले गेले, त्याला बऱ्याच प्रमाणात क्षती पोहोचली आहे. सरकारांनी सामान्य स्थितीपेक्षा जास्त कर्जे काढल्यामुळे मुद्रा पुरवठा वाढून महागाई वाढली आणि बेरोजगारीचा प्रश्न हा जिथल्या तिथेच राहिला. (वर उल्लेखिलेल्या पुस्तकाद्वारे जागतिक भांडवलशाहीला

टिकवून ठेवले म्हणून केन्स यांना इंग्लंडमधील सरंजामशाही परंपरेतील ‘लॉर्ड’ हा किताब दिला गेला अन्यथा पर्याय म्हणून जगापुढे सोव्हियत मॉडेल होते.)

१९९१-९२च्या खासगीकरण, जागतिकीकरण, उदारीकरण आणि मुक्त जागतिक व्यापारामुळे उत्पादन वाढेल, बेरोजगारी हटेल, सामान्य माणसाचे उत्पन्न वाढेल अशा अपेक्षा व दावे विकसित देशांकडून करण्यात आले होते. या प्रश्नाचे एक अभ्यासक सी. पं. खेर म्हणतात की, ‘‘केन्सने कल्पना केली होती की आपल्या नातवंडांच्या काळात आर्थिक प्रश्न गौण ठरतील आणि सर्जनशीलता, कलासक्ती अशा जीवनाच्या व मानवी संबंधाच्या प्रश्नांना मनबुद्धीच्या क्षेत्रात प्रमुख स्थान मिळेल, ती साध्य झालेली नाही’’ *(पाहा-आर्थिक सुधारणांचे नवे पर्व, दिलीपराज प्रकाशन, पुणे, १९९९ पृ. क्र. २७९).* जागतिकीकरण स्वीकारल्यापासून आतापर्यंतसुद्धा बेरोजगारीचा प्रश्न सोडविता आलेला नाही. ह्याच प्रश्नावर २०२४च्या लोकसभा निवडणुकांमध्ये बेरोजगारी असह्य होत आहे व त्याकडे लक्षच दिले जात नाही, असे म्हणत लोकांनी सत्ताधारी गठबंधनाला हात आखडता घेतला. खुद्द केन्सच्याच इंग्लंडमध्ये ४ जुलैला झालेल्या निवडणुकीमध्ये हुजूर पक्षाला हादरा बसून मजूर पक्ष मोठ्या बहुमताने सत्तेत आला आहे. हे परिवर्तनसुद्धा बेरोजगारी नियंत्रणात येऊ न शकल्याचा परिणाम आहे. संपूर्ण युरोपभर वाढत्या महागाईमुळे राहणीमान टिकवण्याचे संकट (standard of living crisis) निर्माण झाले आहे. नवीन तंत्रज्ञानामुळे सगळीकडेच उत्पादन वाढत आहे मात्र त्याच्या प्रमाणात रोजगार वाढ ही नगण्य आहे म्हणून (वस्तू उत्पादन × किमती म्हणजे) राष्ट्रीय उत्पन्न काही प्रमाणात वाढत आहे पण ते वाढते उत्पादन रोजगार निर्माण करीत नाही, अशी विसंगत परिस्थिती सगळ्याच देशांमध्ये निर्माण झाली आहे.

जर भांडवलशाही उत्पादन प्रणाली जगापुढील महागाई व बेरोजगारी हे प्रश्न सोडवू शकत नसेल, तर पर्याय काय असू शकेल असा विचार देशोदेशीचे लोक करीत आहेत. त्यामध्ये समाजवादी अर्थप्रणाली हा एक विकल्प म्हणून लोकांच्या नजरेत आहे. तो पर्याय प्रत्यक्षात उतरण्यासाठी भांडवलशाहीच्या बरोबर वैचारिक व व्यावहारिक संघर्ष करणे आवश्यक होऊन जाते. ब्रिटनच्या पाठोपाठ तीनच दिवसांनी फ्रान्समध्येही निवडणुकांसाठी मुदतपूर्व मतदान झाले. त्यात मध्यमशक्ती आणि उजव्या शक्ती निवडून येतील, असे सर्व अंदाज असताना मतदानानंतरच्या सर्वेक्षणात (एक्झिट पोल) डाव्या पक्षांची संघटना अचानक लोकांच्या पसंतीस उतरताना दिसली. त्यामुळे फ्रान्समध्ये आता नवीन सरकार कशा प्रकारचे असेल; हे तेथील

राजकीय घडामोडी ठरवतील. निश्चितपणे मजूर पक्ष आणि डावे पक्ष हे भांडवलशाहीच्या विरोधात असल्यामुळे लोकांनी मूकदर्शक बनण्याऐवजी डाव्या पक्षांना पसंती दिली आहे. हे राजकीय वारे कोणत्या दिशेने जात आहेत ते दर्शवितात.

भारतामध्येही सुमारे साडेपाचशे लोकसभा जागांपैकी चारशेपेक्षा जास्त जागा आम्हाला मिळतील, असे सत्ताधारी गठबंधनाने म्हटले होते. परंतु जगातील सगळ्यात मोठ्या राजकीय लढाईने सत्ताधारी पक्षाला केवळ २४० जागा देऊन बहुमतापासून दूर ठेवले आणि स्वत:च्या अवाढव्य मागण्या मांडून काही पक्ष गठबंधनात आणून सरकार तयार केले गेले. तथापि त्यात अंतर्गत राजकीय आणि आर्थिक ताणतणाव वाढताना दिसत आहेत. भारतातील ताज्या निवडणुकीत जनतेचे महत्त्वाचे मुद्दे मात्र महागाई आणि बेरोजगारी हेच होते.

मुख्य सैद्धांतिक व व्यावहारिक प्रश्न असा निर्माण होतो की लोकसंख्या वाढीबरोबर उचित प्रमाणात रोजगार का निर्माण होत नाही? भारतातील सध्याचे सरकार जनतेला असे सांगत आहे की २०४७ पर्यंत (म्हणजे भारताच्या स्वातंत्र्याच्या शताब्दीपर्यंत) भारत हे विकसित राष्ट्र होईल आणि राष्ट्रीय उत्पन्नाच्या दृष्टीने जगातील तिसऱ्या क्रमांकाचे राष्ट्र बनेल. परंतु सरकार असे म्हणत नाही की, २०४७ पर्यंत महागाई व बेरोजगारी नसणारी अर्थव्यवस्था आम्ही निर्माण करू!

❖ ❖ ❖

३

# २०१४च्या आधीच्या दशकातील पार्श्वभूमी

वरील सैद्धांतिक विश्लेषणाकडून जेव्हा आपण भारतातील प्रत्यक्ष परिस्थितीकडे वळतो, त्या वेळी आपल्याला राजकीय, प्रशासकीय व आर्थिक घटक परस्परांमध्ये मिसळून एकमेकांवर परिणाम करताना दिसतात. त्याला अभ्यास पद्धती म्हणून मार्क्सने 'डायनामिक्स' (गतिमानता) आणि 'डायलेक्टिक्स' (विरोध-विकासवाद) या संकल्पना वापरल्या होत्या. त्याचा अर्थ असा होतो की विकासाची प्रक्रिया ही सरळ रेषेसारखी नसून ती कमी-जास्त होणारीसुद्धा असते; आणि ती सातत्याने शासन, तंत्रज्ञान, श्रमिकवर्ग, उत्पादक आर्थिक धोरणे, नैतिकतेच्या संकल्पना ह्या सगळ्यांच्या सकारात्मक व नकारात्मक प्रभावांमधून सिद्ध होत असते. कधी-कधी विकास मागेसुद्धा जातो आणि ह्या विविध धोरणांपैकी प्रत्येक धोरण किती शक्तिमान वा प्रभावी आहे, त्याप्रमाणे एकूण परिस्थितीवर त्यांचा ठसा उमटतो; आणि विकास प्रक्रियेला तितकी वळणे पडतात.

१९९१च्या आधी भारतात समाजवादी उद्दिष्टे असलेली मिश्र अर्थव्यवस्था होती आणि तत्कालीन सरकारे जागृतपणे रोजगार निर्मिती, उत्पन्न विषमता इत्यादी विषयांकडे प्रामुख्याने लक्ष ठेवून असत. मात्र १९९१ पासून जागतिक स्तरावर चालू असलेल्या मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार सरकारने केला आणि पूर्वीच्या समतावादी धोरणांकडे ठरवून दुर्लक्ष केले. जे नवीन धोरण स्वीकारले गेले, त्यात समाजवादाचा अंशही दिसू नये म्हणून त्याला 'नवीन आर्थिक धोरण' (खासगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण=खाउजा) म्हटले गेले. यात सार्वजनिक उद्योगांचे खासगीकरण करणे, मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापार यांच्यावर भर दिला गेला व त्यातून उत्पादन झपाट्याने वाढून सर्व लोकांकरिता आर्थिक न्याय निर्माण होईल, असे म्हटले गेले. १९९५ पासून 'जागतिक

व्यापार संघटन' स्थापन करून त्यायोगे अनिर्बंध मुक्त व्यापार चालेल आणि त्यातून उत्पादन वाढ व रोजगार निर्मिती पुरेशी होईल, असे सांगण्यात आले. त्यासाठी मुक्त व्यापाराला 'विकासाचे इंजिन' असे म्हटले गेले.

या बदलांचा मुख्य परिणाम असा झाला की, भारत सरकारचे आर्थिक धोरण पूर्णपणे भांडवलवादी बनले. जागतिकीकरणाचे, दावा केल्याप्रमाणे लाभ मिळत नाहीत, असे लवकरच दिसू लागले. नरसिंहराव आणि डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वात हे धोरणात्मक बदल स्वीकारले गेले. परंतु १९९६ मध्ये काँग्रेस पक्ष लोकसभा निवडणूक हरला. कपिल सिब्बल त्या वेळी सुषमा स्वराज यांच्या विरुद्ध हरले. पत्रकारांनी हरण्याची कारणे विचारली असता, त्यांनी सांगितले की जागतिकीकरण आणि मुक्त अर्थव्यवस्था यांचे जे फायदे आम्ही सांगितले होते; ते १९९१-९६ या काळात लोकांना दिसून आले नाहीत. काँग्रेसने जागतिकीकरण स्वीकारले म्हणून भाजपने त्या वेळी काँग्रेसवर टीका केली. पण १९९९ मध्ये जेव्हा भाजपचे सरकार केंद्रात आले तेव्हा त्यांनी तीच जागतिकीकरणाची धोरणे नुसतीच चालू ठेवली असे नव्हे, तर ती आणखी शिथिल केली. तत्कालीन प्रधानमंत्री श्री. अटलबिहारी वाजपेयी यांना पत्रकारांनी जेव्हा विचारले की, ज्या धोरणांचा तुम्ही विरोध केला, तीच धोरणे तुम्ही चालवत आहात! त्यावर त्यांनी असे उत्तर दिले की, ''आम्हाला जो वारसा मिळाला; तोच आम्ही पुढे चालवत आहोत''. त्या धोरणांचा अल्पकालीन परिणाम काही प्रमाणात उत्पादन वाढीत झाला, परंतु भांडवलशाही हा शब्द प्रत्यक्ष माहीत नसलेलेसुद्धा त्या धोरणांवर मोठ्या प्रमाणात टीका करत होते. भाजप सरकारने 'भारत तेजोमय होत आहे' (India is shining) अशी घोषणा २००४ च्या लोकसभा निवडणुकीसाठी तयार केली होती. त्या सरकारला आपण पुन्हा निवडून येऊ याची जवळपास खात्रीच होती. त्यामुळे निवडणुकीची मतमोजणी होत असताना जेव्हा भाजपचे सरकार अल्पमतात आले तेव्हा त्यांच्याच पैकी अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला.

## २००५ ते २०१४

२००५ मध्ये काँग्रेस पक्ष (सं. प्रा. गठबंधन) केंद्रात सत्ताधारी झाला व डॉ. मनमोहन सिंग हे प्रधानमंत्री झाले. २००८ मध्ये जागतिक मंदी आली आणि तिचा परिणाम भारतातही बेरोजगारी वाढण्यात झाला. भारत सरकारने त्या काळात उद्योजकांना उत्पादनानुसार आर्थिक प्रोत्साहन देणे सुरू ठेवले, त्यामुळे बेरोजगारीतील वाढीची दाहकता थोडी कमी झाली. परंतु बेरोजगारीचा प्रश्न तीव्रच होता. त्याच्या जोडीला, सरकारने कोळशाच्या खाणींचे जे लिलाव

केले, त्यातील घोटाळ्यामुळे आणि अवकाशातील संचार साधनांच्या (स्पेक्ट्रम) लिलावातही गोंधळ झाल्याने, ते सरकार हतबल व निष्क्रिय झाल्यासारखे दिसत होते. त्या निष्क्रियतेवर उद्योजक वर्ग स्वत:च्या मागण्या पूर्ण होत नाही म्हणून अतिशय नाराज होता. ही नाराजी जेवढी वाढत गेली, तेवढे ते सरकार शक्तिहीन व प्रभावहीन होत गेले. त्या काळातली दोन महत्त्वाची उदाहरणे अशी की स्पेक्ट्रमच्या अंशाचा लिलाव करताना संबंधित मंत्र्यांनी जी बेफिकिरी दाखवली व मनमानी केली, त्यावर न्यायालयाने अशी टिप्पणी केली होती की स्पेक्ट्रम ही राष्ट्रीय संपत्ती आहे, मंत्र्यांची खासगी मालमत्ता नव्हे. अशी पथ्ये पाळून व्यवहार झाले नाहीत. कोळशाच्या खाणींचे परवाने जेव्हा विकले गेले तेव्हा परवाने घेणारे उद्योजक हे उत्पादन वाढविण्यामध्ये रस असलेले आहेत, अशी सरकारातही मान्यता होती. मात्र अनेकांनी ते परवाने उच्च दराने इतरांना विकून 'परवान्यांचा बाजार' केला. या सर्व प्रश्नांमध्ये बेरोजगारीचा प्रश्न सर्वात महत्त्वाचा होता, हे अधोरेखित होणे महत्त्वाचे आहे.

२०२४च्या लोकसभा निवडणुकीनंतर काँग्रेस गठबंधनाला (संयुक्त पुरोगामी आघाडी) डाव्या पक्षांनी समर्थन दिले होते आणि त्यासाठी एक समान किमान कार्यक्रम आखण्यात आला होता. परंतु २००८ पर्यंत सं. प्रा. सरकार समान किमान कार्यक्रमाला धरून कार्य करीत नाही, असे दिसून आले. लोकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांकडे सरकारचे दुर्लक्ष होऊ लागले. त्यामुळे सरकारवरील लोकांचा विश्वास कमी होऊ लागला, जीवनावश्यक वस्तूंची भाववाढ होतच राहिली, कृषी क्षेत्रातील अरिष्टाबद्दल कमालीची बेपर्वाई; तसेच शेतकऱ्यांच्या आत्महत्यांविषयी बेफिकिरी; यांच्यामुळे डाव्या पक्षांनी काँग्रेसप्रणीत सरकारचा पाठिंबा काढून घेतला. शासनाच्या धोरण प्रणालीची व अंमलबजावणीची घसरण चालूच राहिली. भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या मार्च २०१२ मधील महा-अधिवेशनात तोपर्यंत निर्माण झालेले प्रश्न पुढीलप्रमाणे मांडले गेले - आर्थिक क्षेत्रात मक्तेदारी आणि संबंधितांची भांडवलशाही (क्रोनी कॅपिटालिझम) यांनी अक्राळ-विक्राळ रूप धारण केले व भ्रष्टाचार वाढू दिला; धनदांडग्यांच्या फायद्याचे अंदाजपत्रक, दारिद्र्य आणि आर्थिक विषमता, काळा पैसा, शिक्षणाचे बाजारीकरण, स्त्रियांच्या सक्षमीकरणाकडे दुर्लक्ष यांची नोंद घेतली गेली. *(पाहा-कॉम्रेड बर्धन यांचे चरित्र, लेखक- प्रा. तानाजी ठोंबरे, प्रकाशक- कॉ. गोविंद पानसरे अमृत महोत्सव समिती, कोल्हापूर, फेब्रु. २०१५, पृ.- १०७-०८).*

हे सगळे प्रश्न जनतेपुढे आणखी भडकपणे मांडून लोकसभा निवडणूक जिंकणे हे भाजपसाठी सोपे होऊन गेले.

## २०१४-२४

२०१४च्या निवडणुकांमध्ये हे सगळे आर्थिक प्रश्न महत्त्वाचे शस्त्र म्हणून विरोधकांकडून वापरले गेले. २०१४च्या निवडणुका या भारतातील निवडणूक परंपरेप्रमाणे न होता वेगळ्याच पद्धतीने झाल्या; आणि एका पक्षाच्या सरकारच्या ऐवजी एका व्यक्तीच्या नावाने सरकार येईल, अशा घोषणा त्या संपूर्ण काळात होत्या. वास्तविक पाहता सरकारमध्ये कोण व्यक्ती प्रमुख असावा याचा अधिकार पक्षनिहाय निवडून आलेल्या सभासदांचा असतो. नंतरच त्या सरकारला त्या नेत्याच्या नावाने ओळखले जाते. हे निश्चितपणे लोकशाहीचा ऱ्हास दर्शविते. मनमोहन सिंग सरकारच्या काळातील चुकांचा भरपूर फायदा घेत जनतेला त्याविरुद्धची आश्वासने देण्यात आली. उदाहरणार्थ, दरवर्षी २ कोटी इतका रोजगार निर्माण करण्यात येईल, असे आश्वासन सगळ्या निवडणूक सभांमध्ये दिले गेले; त्याचबरोबर विदेशातील बँकांमध्ये असलेला काळा पैसा देशात आणून, त्यातून देशातील प्रत्येक नागरिकाच्या खात्यात रु. १५ लाख जमा करण्यात येतील; असे म्हटले गेले. त्यामुळे बेरोजगारी कमी होईल, आपल्या खात्यात लाखो रुपये पडतील, आणि घोषणा देणाऱ्या पक्षाच्या म्हणण्याप्रमाणे *'अच्छे दिन'* (सुगीचे/सुखाचे दिवस) येतील, असेही म्हटले गेले. त्यामुळे साहजिकच सगळा तरुण वर्ग आणि सामान्य मतदार वर्ग ह्या घोषणांवर भाळला आणि भाजपचे गठबंधन मोठ्या बहुमताने निवडून आले. जणू काही सगळ्या समस्यांचा व त्यावरील उपायांचा आधीच पूर्ण विचार झालेला आहे आणि त्यांची चर्चा न करता फक्त अंमलबजावणीच बाकी आहे; असे दाखवत सरकारने आपली कारकीर्द सुरू केली. त्या धोरणांमध्ये नोटाबंदी, भांडवलदारांची कर्जे माफ करणे; बँकांनी दिलेल्या कर्जाची अत्यंत अपुरी (६-७% आसपास) वसुली करणे; बँकांसहित सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे वेळापत्रक ठरवून तातडीने खासगीकरण करणे; इत्यादींचा समावेश होता. ह्या धोरणांमुळे भांडवलदार वर्ग हा साहजिकच सरकारच्या जवळ गेला आणि सत्ताधारी पक्षांना पैशाचा पुरवठा होऊन सत्ताधारी गठबंधनाची आर्थिक स्थिती, जगातल्या सत्ताधारी पक्षांपेक्षा चांगली झाली. सत्ताधारी गठबंधन हे प्रामुख्याने आर्थिक प्रश्नांसाठीच कार्य करत आहे; अशाही घोषणा ('सबका साथ सबका विकास') दिल्या गेल्या. ह्या कारणाने जनताही मोठ्या प्रमाणावर सरकारच्या बाजूने गेली आणि २०१९ च्या निवडणुका

पुन्हा जिंकणे सहज सोयीचे झाले. हे सगळे एकाच व्यक्तीच्या निर्णय आणि अंमलबजावणी क्षमतेमुळे होत आहे; असे दाखविल्या गेल्यामुळे त्या गठबंधनातही पर्यायी नेतृत्व म्हणून विचार करण्याचा प्रश्नाच नाही, असेही सूचित केले गेले. परंतु २०२०च्या निवडणुकांनंतर २ वर्षे कोरोनाचे संकट होते व नंतरच्या ३ वर्षांमध्ये सत्ताधारी गठबंधनाचा आर्थिक कार्यक्रमाशिवाय जो अजेंडा होता, त्यानुसार उरलेल्या तीन वर्षांच्या काळात धार्मिक प्रश्न सोडवायचे, शिक्षणाच्या क्षेत्रात विशिष्ट धर्माच्या दृष्टिकोनातूनच बदल करायचे, ज्या समाजघटकांना आरक्षण मिळत आहे, त्या आरक्षणाच्या पदांचे कार्य आरक्षण न भरता त्याचे खासगीकरण करणे अशा कार्यांचा धडाका सुरू झाला. ठिकठिकाणी संविधानातील तरतुदी टाळल्या गेल्या. त्यामुळे संविधान व त्याच्या तरतुदी धोक्यात येत आहेत, अशी शंका संविधान-लाभार्थी समाजघटकांमध्ये निर्माण झाली. जेव्हा सत्ताधारी गठबंधनाने २०२४च्या निवडणुकीत सत्ता स्थापन करण्यासाठी २७२चे बहुमत आवश्यक असताना ४०० पेक्षा अधिक जागांचे उद्दिष्ट जाहीर केले. तेव्हा हे अतिकेंद्रीकरणाचे व संविधान बदलविण्याचे संकेत तर नाही ना? अशी रास्त भीती अनेक समाजघटकांमध्ये निर्माण झाली; व त्यातून एक राजकीय शक्ती अस्तित्वात आली. त्या शक्तीचा परिणाम म्हणून इतर आर्थिक धोरणांचा विपरीत परिणाम म्हणून, २०२४च्या निवडणुकांमध्ये मुख्य सत्ताधारी पक्षाला २७२ पेक्षा कमी (२४०) जागा मिळाल्या. प्रयत्नपूर्वक बिहारमधील जनता दल युनायटेड (जदयू) आणि आंध्र प्रदेशमधील तेलुगु देसम पार्टी यांना सोबत घेतल्यामुळे सत्ताधारी गठबंधनाची संख्या २९४ इतकी झाली आहे. परंतु नव्याने आणलेले राजकीय पक्ष हे स्वत:च्या आर्थिक अटींसह (जसे, अविकसितपणाचा विशेष दर्जा) आलेले असल्यामुळे, नव्या सरकारची धोरणक्षमता व अंमलबजावणी क्षमता ह्याबाबत केंद्रित अधिकारशाहीच्या तुलनेत (२०१४-१९चा काळ) कमी राहील का? अशी शंका उपस्थित होते व अशा अस्थिरतेच्या काळात बेरोजगारी आणि महागाई या मुख्य प्रश्नांकडे दुर्लक्ष होण्याची भीती देशभरातील जनतेच्या मनात निर्माण झाली आहे.

आता आपण प्रस्तुत सत्ताधारी गठबंधनाच्या १० वर्षांच्या काळाचा आर्थिक दृष्टिकोनातून आढावा घेऊ-

❖ ❖ ❖

# ४

# आर्थिक धोरणे २०१४-२४

### मोठ्या उद्योगांची कर्जमाफी

प्रस्तुत सरकारचे मुख्य धोरण मोठ्या उद्योजकांची थकीत कर्जे ही कर्ज देणाऱ्या सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या खाते पुस्तकातून काढणे आणि नंतर वेगळ्या प्राधिकरणाकडून वसूल करण्याचे होते व आहे. त्यात उद्योजकांना मोठा त्वरित दिलासा मिळाला व त्यातून त्यांच्यासाठी उत्पादन वाढ व नफा वाढ यांचा रस्ता प्रशस्त झाला. बँकांच्या खाते पुस्तकातून ह्या रकमा काढून टाकल्यामुळे जणू काही बँकांची थकीत कर्जे नाहीतच; अशा सरकारची परिस्थिती कायदेशीररीत्या निर्माण केली गेली. असे सांगितले गेले की उद्योजकांची ही संबंधित कर्जेही माफ केली गेली नाही, ती फक्त निर्लेखित केलेली आहेत व ती वसूल केली जातील. ज्या प्राधिकरणाकडून उद्योजकांच्या कर्जांची वसुली व्हावयाची होती, ती २०२४ पर्यंत सरासरी केवळ ६% झाल्याचे दिसून येते. याचाच अर्थ असा की, बँकांनी दिलेली सुमारे ९४% कर्जे वसूल झाली नाहीत. त्यात उद्योजकांचा फायदा तर झालाच, परंतु बँकांचा तोटा झाला; म्हणजे पर्यायाने ज्या जनतेने बँकांकडे ठेवी ठेवल्या होत्या व त्यांच्या आधारावर बँकांनी उद्योजकांना कर्जे दिली होती, त्या ठेवीदारांचे मात्र नुकसान झाले. बँकांच्या खात्यात एकूणच जी थकीत कर्जे आहेत, त्यांची वसुली बँकांच्या चालू नफ्यातून 'तरतूद' (provisioning from operating profits) करून केली व बँका सुस्थितीत आहेत; असे दाखविले गेले. मात्र ज्या ठेवीदारांच्या ठेवींमधून मिळालेला नफा बाजूला करून इतरांची थकीत कर्जे वसूल केल्याचे दाखवून बँकांची परिस्थिती सुधारली आहे, असे म्हणणे आणि अमलात आणणे हे लेखा पद्धतीत बसत असले तरी ते अनैतिक आहे; हे अधोरेखित व्हावे.

**तक्ता क्र. - १**

२०१४ ते २०२४ या काळात झालेली मोठ्या उद्योजकांची कर्जमाफी

| वर्ष | कर्जमाफी (रु.) |
|---|---|
| २०१४ | ५० हजार कोटी |
| २०१५ | ६० हजार कोटी |
| २०१६ | १ लाख ८० हजार कोटी |
| २०१७ | २ लाख कोटी |
| २०१८ | २ लाख २० हजार कोटी |
| २०१९ | १ लाख ९० हजार कोटी |
| २०२० | २ लाख १० हजार कोटी |
| २०२१ | १ लाख ८० हजार कोटी |
| २०२२ | १ लाख ७० हजार कोटी |
| २०२३ | १ लाख ७० हजार कोटी |
| २०२४ | १ लाख ५० हजार कोटी |
| एकूण | १७ लक्ष ७० हजार कोटी |

(वरील आकडे विविध स्रोतांमधून संकलित केलेले आहेत.)

उघड आहे की हे कर्जमाफीचे फायदे जे मोठ्या उद्योगांना मिळालेत, ते न शेतकऱ्यांना मिळाले न सूक्ष्म व लघुउद्योगांना मिळाले. त्यामुळे अर्थव्यवस्थेच्या मोठ्या औद्योगिक क्षेत्रात सुगी होती व आहे आणि शेती, लघुउद्योग इ. क्षेत्रात मात्र साततत्याने चणचण आणि अडचण भासत असल्याचे चित्र आहे.

**सकल राष्ट्रीय उत्पन्नातील वृद्धी (GDP Growth)**

आर्थिक विकास ही एक अखंड चालणारी प्रक्रिया आहे. कालमानाप्रमाणे जेव्हा सरकारे बदलतात, तेव्हा त्या सरकारांच्या धोरणानुसार विकास प्रक्रियेमध्ये, म्हणजे राष्ट्रीय उत्पन्नाच्या वृद्धीमध्ये काही बदल आढळून येतात. त्या बदलांतर्गत सरकारी धोरण आणि देशातील व विदेशातील प्रत्यक्ष आर्थिक परिस्थिती, यांचा संयुक्त परिणाम दिसतो. जेव्हा विकास प्रक्रियेत प्रतिकूलता येते, त्या वेळी प्रत्यक्षातील परिस्थिती बदलता येत नाही म्हणून सरकारला आपले धोरण बदलावे लागते. धोरणातील बदल किती

चांगल्या प्रकारे केला जातो व त्याची अंमलबजावणी कशी केली जाते, हे वृद्धी दरांच्या आकड्यांवरून दिसून येते. वृद्धी दरामुळे लोकांच्या उत्पन्नात, संपत्तीत, रोजगार इत्यादींमध्ये वाढ होते म्हणून सगळ्यांनाच वाढत जाणारा विकास दर हवा असतो.


**तक्ता क्र. - २**

सकल राष्ट्रीय वृद्धी दर (वर्ष २०१० ते २०२४)

| वर्ष | GDP वृद्धीदर (%) | वर्ष | GDP वृद्धीदर (%) |
|---|---|---|---|
| २०१० | ८.५ | २०१७ | ६.८ |
| २०११ | ५.३ | २०१८ | ६.४ |
| २०१२ | ५.५ | २०१९ | ३.९ |
| २०१३ | ६.४ | २०२० | -५.८ |
| २०१४ | ७.४ | २०२१ | ९.०५ |
| २०१५ | ८ | २०२२ | ७ |
| २०१६ | ८.२ | २०२३ | ७.२ |
| | | २०२४ | ६.५ |

स्रोत : World Bank Open Data and the Ministry of Statistics and Programme Implementation (MoSPI) of India

**आलेख क्र. १**




स्रोत : World Bank Open Data and the Ministry of Statistics and Programme Implementation (MoSPI) of India

२००८ मध्ये जी मंदी आली होती, तिचा प्रभाव कमी कसा ठेवता येईल; याचा प्रयत्न तत्कालीन डॉ. मनमोहन सिंग सरकारने केला. मंदीतून बाहेर निघताना २००९-१० मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेचा वृद्धीदर ८.५% होता; तो २०१०-११ मध्ये ५.२% झाला; पण त्यानंतर त्यात सातत्याने सुधारणा दिसते; तो २०११-१२ मध्ये ५.५% होता; २०१२-१३ मध्ये ६.४; २०१३-१४ मध्ये ७.४% होता आणि २०१४-१५ (जेव्हा नवीन सरकार नुकतेच आले होते व जुन्या सरकारच्या धोरणांचा प्रभाव टिकून होता त्या वेळी) वृद्धीदर ८% होता. २०१५-१६ च्या ८.२% दरापासून जी घसरण सुरू झाली ती २०१९ पर्यंत दिसून येते, २०२० मध्ये कोरोनातील लॉकडाऊनमुळे वृद्धीदर उणे झाला, त्या उणे दराला शंभर टक्के समजून २०२०-२१ चा दर एकदम ९% पर्यंत वाढलेला दिसतो. मोजण्याचा पाया उणे असल्यामुळे पुढील वर्षात एकदम होणाऱ्या मोठ्या वाढीला 'बेस इफेक्ट' म्हणजे पायाचा परिणाम असे म्हटले जाते. २०२१-२२ पासून २०२३-२४ पर्यंत हा दर अनुक्रमे ७%, ७.२% व ६.५% होता.

२०१४-१५ पासून २०१९ पर्यंत उत्पन्न वाढीचा दर कमी का होत होता; याचे एक स्पष्टीकरण असे आहे की, सरकारच्या धोरणातील चंचलता आणि अव्यवहार्यता पाहून खासगी क्षेत्र गुंतवणूक करण्यास तयार नव्हते आणि करांचे दर कमी करून व इतर सवलती देऊनसुद्धा खासगी क्षेत्र गुंतवणुकीसाठी पुढाकार घेत नाही, हे शासनाचे दु:ख होते. हे सरकारकडून बरेचदा व्यक्त केले गेले. शासनाने उद्योजकांना एवढेसुद्धा म्हटले की तुम्ही 'अनिमल स्पिरीट' (बेगुमानपणे शिकार करण्याचे पशुतुल्य वर्तन) दाखवून, जोखीम घेऊन भांडवलाची गुंतवणूक करावी आणि आज २०२४ मध्येसुद्धा तशीच परिस्थिती आहे, त्यामुळे सरकारच्या भांडवली खर्चावर एकूण गुंतवणूक ठरत आहे. अधिकृत आकडेवारी दर्शविते की २०१५-१६च्या राष्ट्रीय उत्पन्न वाढीची पातळी भारतीय अर्थव्यवस्थेला अद्याप गाठता आलेली नाही. इतर देशांच्या तुलनेने भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाचा वृद्धीदर उच्च आहे असे मान्य केले, तरी भारताच्या स्वत:च्याच उत्पन्न वाढीचा दर, भारतीय अर्थव्यवस्था टिकून ठेवू शकली नाही; हेही तेवढेच सत्य आहे.

### शासकीय कर्ज

वर उल्लेख केल्याप्रमाणे विकास घडवून आणायचा असेल तर एका विशिष्ट दराने भांडवलाची गुंतवणूक होणे आवश्यक असते. त्या दरामध्ये खासगी भांडवलाचा किती व शासकीय भांडवलाचा किती हिस्सा आहे; हा

मुद्दा एका मर्यादेपर्यंत गौण असतो. परंतु त्या मर्यादेनंतर गुंतवणूक कोण करतो आहे आणि भांडवल कोठून येते हा मुद्दा महत्त्वाचा ठरतो. भारतातील अस्थिर परिस्थितीमुळे खासगी क्षेत्र भांडवल गुंतविण्यास त्या वेळी तयार नव्हते; तसेच श्रीमंत वर्ग कराचे दर वाढविण्याच्याही विरोधात होता. म्हणून विकासाचा एकच मार्ग खुला होता, तो म्हणजे शासनाने भांडवल गुंतवणे आणि ते भांडवल देशी व विदेशी बाजारातून कर्ज काढून उभारणे. खालील तक्ता व आलेखावरून हा मुद्दा स्पष्ट होईल –


**तक्ता क्र. - ३**

शासकीय कर्ज (२०१४-१५ ते २०२३-२४)

| UPA (संपुआ) | | NDA (रालोआ) | |
|---|---|---|---|
| वर्ष | शासकीय कर्ज (कोटी रु.) | वर्ष | शासकीय कर्ज (कोटी रु.) |
| २००५-०६ | २,१६८,९०६ | २०१४-१५ | ६,४१२,५१४ |
| २००६-०७ | २,४२९,३८० | २०१५-१६ | ७,१५७,०५६ |
| २००७-०८ | २,७५८,४२१ | २०१६-१७ | ७,९४४,५४४ |
| २००८-०९ | ३,१५०,६१५ | २०१७-१८ | ८,७६५,०३३ |
| २००९-१० | ३,५९९,६७२ | २०१८-१९ | ९,६९०,२९७ |
| २०१०-११ | ४,०५९,८०५ | २०१९-२० | १०,७१४,०८२ |
| २०११-१२ | ४,५८६,२७३ | २०२०-२१ | १२,०२६,५६८ |
| २०१२-१३ | ५,१५९,४८५ | २०२१-२२ | १३,७१०,२७५ |
| २०१३-१४ | ५,७५५,६६२ | २०२२-२३ | १५,७४४,८३७ |
| - | - | २०२३-२४ | १८,०२८,७९३ |

स्रोत : CEIC Data

## आलेख क्र. २




स्रोत : CEIC Data

शासकीय कर्ज हे संपूर्ण देशाला करांच्या रूपाने फेडावेच लागते. त्यात ऋणपत्र विकत घेणारा वर्ग हा श्रीमंत वर्गच असतो आणि परतफेड करताना करांच्या (विशेषत: अप्रत्यक्ष करांच्या) रूपाने सामान्य माणूस भरत असतो. त्यामुळे कर्जाचे राष्ट्रीय उत्पन्नाशी प्रमाण (ज्यावर आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा विशेष भर आहे.) हे शासनाच्या (आणि देशाच्या) कर्जफेडीची क्षमता दर्शवते, परंतु मध्यम आणि अल्प उत्पन्नाचे लोक आपल्या उपभोगातून मोठ्या प्रमाणावर परतफेड करतात आणि त्यामुळे वस्तू उत्पादनाच्या रूपाने विकास जरी दिसत असला, तरी त्यातील त्याग आणि लाभाचे गणित पाहता सामान्य माणूस अधिक कर्जबाजारी होतो आणि त्याची उपभोग क्षमता तेवढ्या प्रमाणात मर्यादित होते. या विषमतेकडे दुर्लक्ष करता येत नाही.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या दृष्टिकोनातून भारतीय सार्वजनिक कर्जाचे राष्ट्रीय उत्पन्नाशी प्रमाण सुमारे ८४% झाले आहे. नाणेनिधीने सर्वच देशांना शासकीय कर्जे कमी करावीत, अशा सूचना दिल्या आहेत. त्यामुळे शासकीय कर्जातून विकास म्हणजे सामान्य लोकांवर ओढवणारे दारिद्र्य, असे गणित समजून घेणे आवश्यक आहे. या धोरणाला अमेरिकेसारखे देशसुद्धा (राष्ट्रीय उत्पन्नाच्या १२४% शासकीय कर्ज) दाद देत नाहीत म्हणून त्यांच्याकडे पाहून भारताने दाद देऊ नये असे तर नव्हे? मग एकीकडे वाढता विकास दिसतो, तर दुसरीकडे सामान्यांची उपभोग क्षमता कर्जफेडीमुळे मर्यादित होते. ही एक

नवी विसंगती समोर येत आहे, पण त्याची चर्चा शासकीय पातळीवर किंवा रिझर्व्ह बँकेच्या पातळीवर होताना दिसत नाही. याला विकासाचे नवे प्रारूप म्हणायचे का असा प्रश्न निर्माण होतो.

## नोटाबंदी २०१६

८ नोव्हेंबर २०१६ रोजी पंतप्रधानांनी रात्री ८ वाजता टेलिव्हिजनवर घोषणा केली की, रात्री १२ वाजल्यानंतर देशाच्या चलनातील ५०० आणि १००० रु. या नोटा बंद केल्या जातील आणि त्याऐवजी दुसऱ्या नोटा सरकार यथावकाश बदलून देईल. ह्या अचानक निर्णयामुळे देशातील सामान्य लोकांचे व्यवहार किंवा आर्थिक जीवन पूर्णत: विस्कळीत झाले. (श्रीमंत लोकांचे व्यवहार मात्र सुरळीत चालू राहिले!) सरकारने असे घोषित केले की पाकिस्तानकडून नेपाळमार्गे येणाऱ्या भारताच्या नकली नोटांचा प्रवेश थांबविणे; त्या नोटांच्या रूपात देशात आणि विदेशात जो काळा पैसा निर्माण झालेला आहे तो कमी करणे; देशातील आर्थिक भ्रष्टाचार कमी करणे; इत्यादी उद्देश साध्य करण्यासाठी नोटाबंदीचा निर्णय घेण्यात आला. असे म्हटले जाते की त्यावेळच्या रिझर्व्ह बँक गव्हर्नरलासुद्धा त्याची माहिती दिली गेली नसावी. दुसऱ्या दिवसापासून देशभरात खेड्यांपासून-शहरांपर्यंत बँकांच्या सगळ्याच शाखांपुढे लोकांच्या रांगा लागल्या आणि लोक त्या नोटा सरकारने म्हटल्याप्रमाणे बदलवून आपले व्यवहार करण्याचा प्रयत्न करीत होते. इतर मूल्यांच्या तेवढ्या नोटा उपलब्ध नसल्यामुळे ठिकठिकाणी लोकांची निराशा झाली. लग्ने, आजारपण, कारखान्यांमध्ये कच्च्या मालाची खरेदी, मजुरांची मजुरी हे सगळे व्यवहार धोक्यात आले. परंतु सरकारने अशी भूमिका घेतली होती की याच मार्गाद्वारे देशातील काळे व्यवहार ताबडतोब बंद होतील. भारतीय रुपयाच्या आधारावर इतर देशांमध्ये जे रुपयाचे व्यवहार चालतात तेही अडचणीत आले. पंतप्रधानांनी असे म्हटले की, मला ५० दिवसांचा अवधी जनतेने द्यावा, त्यात मी सगळी व्यवस्था पूर्णपणे दुरुस्त करतो. त्या काळात शेतकरी, कारागीर, छोटे व्यापारी, सूक्ष्म-लघु-मध्यम उद्योग अशा लाखो लोकांचे व्यवहार आणि व्यवसाय बंद पडले. अनोंदणीकृत व्यवसायांच्या वार्षिक सर्वेक्षणावरून (पाहा- इंडियन एक्स्प्रेस जुलै १८, २०२४) असे आढळले आहे की, उत्पादनाच्या सगळ्याच क्षेत्रातील वस्तू व सेवा निर्माण करणाऱ्या सूक्ष्म-लघु-मध्यम उद्योगांमध्ये २०१५-१६ पासून २०२२-२३ पर्यंत या सात वर्षांत १६.४५ लाख नोकऱ्या कमी झाल्या. अकुशल लोकांना संघटित उद्योगांमध्ये नोकऱ्या मिळत नसल्यामुळे तेसुद्धा आपले उद्योग

असंघटितपणे करू लागले, म्हणून संख्या थोडीशी वाढली, परंतु वर म्हटल्याप्रमाणे रोजगार मात्र घटला. तीच परिस्थिती सोबत घेऊन आपण २०२४ मध्येसुद्धा वावरत आहोत.

२०२३-२४ मध्ये रोजगार २ कोटींपेक्षा थोडा वाढला आहे, अशी आकडेवारी प्रकाशित झाली, परंतु त्याचे स्पष्टीकरण पुढे असे आले की कठीण आर्थिक परिस्थितीमुळे महिलांना मोठ्या प्रमाणावर मजुरी करावी लागली व त्यामुळे हा आकडा फुगला. तिसऱ्यांदा प्रधानमंत्री पद घेतल्यानंतर रोजगार निर्मितीकरिता असे म्हटले की आम्ही पायाभूत सुविधांचे प्रकल्प (Infrastructure projects) हाती घेऊ, परंतु ह्या सगळ्या प्रकल्पांवर मजुरांना अल्पकाळाकरिता ठेकेदारीने रोजगार दिला जातो तो कायमचा रोजगार नसतो. जर आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या सूचनेनुसार भारताने आपले कर्ज कमी केले आणि अर्थसंकल्पातील तूट कमी करण्यासाठी सरकारचा भांडवली खर्च कमी केला, तर रोजगार वृद्धी कमी होऊन अर्थव्यवस्था बेरोजगारीकडे झुकणारी होईल हे स्पष्ट आहे. मागील सात वर्षांमध्ये लघुउद्योगांतर्गत जी बेरोजगारी वाढली आहे त्याचा सरळ अर्थ ते उद्योग ग्रामीण क्षेत्रात असो किंवा शहरी क्षेत्रात, अल्प उत्पन्नांच्या लोकांमध्ये बेरोजगारी आणि गरिबी वाढली आहे.

जे सरकार रोजगार निर्माण करण्याचे आश्वासन देऊन सत्तेत आले होते, त्याने असलेला रोजगारही बंद पडू दिला. त्या वेळी उद्योजकांची देशव्यापी संस्था 'ऑल इंडिया मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन' यांनी उद्योगांमधील उत्पादन, संपत्ती निर्मिती आणि रोजगार यांच्यावर कसे विपरीत परिणाम होत आहे याचे अहवाल सातत्याने केंद्र सरकारकडे पाठविले, परंतु त्यांची दखल घेतली गेली नाही. सरकार कोणतेही असले तरी चालू रोजगार बुडविणे हे सरकारने टाळलेच पाहिजे, असे सामान्य अर्थशास्त्र सांगते. जे लाखो उद्योग बंद पडले ते पुन्हा सुरू झाले नाहीत पण विकासाच्या प्रक्रियेत नेहमीच जसे नवे उद्योग स्थापित होतात, त्या प्रक्रियेला सरकारने स्वत:चे यश म्हणून सांगितले. प्रधानमंत्र्यांनी मागितलेली ५० दिवसांची मुदत संपल्यानंतर असे लक्षात येऊ लागले की पाकिस्तानातून आपल्या नोटांची नक्कल पकडल्याचे कुठे दिसले नाही देश-विदेशातला भारतीय काळा पैसा क्रांतिकारक पद्धतीने पकडल्याचे कुठे आढळले नाही आणि सरकारने जितका काळा पैसा रुपये ५०० आणि १००० ह्या रूपात देशात आहे असे म्हटले होते, त्यातला सुमारे ९७% पैसा सरकारने जाहीर केलेल्या वेळापत्रकाच्या आत बँकांमध्ये जमा झाला. त्याचा परिणाम म्हणून काळा पैसा कुठे व किती आहे हे सरकार तेव्हाही

सांगू शकले नाही, आणि आजही सांगू शकत नाही. मात्र सामान्य लोकांचे व्यवसाय बंद पडणे व रोजगारावर घाला येणे ही सगळ्यात दु:खदायक घटना होती. त्याहूनही संवेदनहीनतेचा कळस म्हणजे जेव्हा संसदेत असे म्हटले गेले की सुमारे १००च्या वर लोक रांगांमध्ये उभे असताना मृत्यू पावले; त्यावर तत्कालीन अर्थमंत्र्यांनी असे म्हटले ते लोक अन्यथा मृत्यू पावलेच असते. आश्चर्य असे की ह्या क्षणापावेतो सरकारने अवलंबिलेल्या धोरणाची अधिकृत फलश्रुती काय झाली? हे देशाला कळलेले नाही. शिवाय जे उद्योग बंद पडले त्यांच्यापैकी किती सुरू झाले व त्यात किती रोजगार निर्माण झाले; हे कळण्याचा लोकांचा लोकशाही अधिकार आहे, तोदेखील डावलला गेला. एक न सुटलेले कोडे असे की देशातील मोठे उद्योग, मोठ्या सामाजिक संस्था यांना मात्र नवीन नोटा सुरळीतपणे मिळत गेल्या आणि त्यांच्याकडून कुठल्याही तक्रारी ऐकू आल्या नाहीत. सामान्य लोकांच्या जीवनातून मात्र ती दोन-तीन वर्षे नुसतीच चिंता व मनस्तापामध्ये गेली *(पाहा - डॉ. श्रीनिवास खांदेवाले : नोटाबंदीचा प्रयोग-२०१६ ओढवून घेतलेला प्रलय),* भारतीय कम्युनिस्ट पक्ष *(महाराष्ट्र राज्य कौन्सिल, मुंबई, एप्रिल, २०२७).*

**थकीत कर्जाचा प्रश्न**

थकीत कर्जाच्या प्रश्नासंदर्भात असे दिसते की हा एक उद्योग चालवण्यामधील सामान्य प्रश्न आहे. परंतु हा प्रश्न प्रकर्षाने दुर्लक्षित केल्यामुळे, जेव्हा बँकिंग, वित्तव्यवस्थापन आणि उद्योग या सगळ्यांना धक्के देतो, त्या वेळी तो विकासाचा आणि व्यवस्थेचा प्रश्न बनतो. उदा. डॉ. मनमोहन सिंग यांच्या काळात २००८-०९ ते २०१३-१४ या काळात एकूण थकीत कर्जे ५,०४,०२१ रु. होती. २०१४-१५ मध्ये नवीन सरकार आल्यानंतर अशी भावना निर्माण झाली की आता आपण बँकांची कर्जे परत दिली नाही तरी चालू शकेल म्हणून कर्जे थकविणे ही सामान्य बाब होऊन बसली आणि त्याला सरकारचा अप्रत्यक्ष पाठिंबा आहे, असे वातावरण निर्माण झाल्यामुळे बँकासुद्धा काही करू शकल्या नाहीत. त्याचा परिणाम म्हणून २०१४-१५ ते २०१९-२० या काळात बँकांनी दिलेली कर्जे बाधित होण्याचे प्रमाण तीन पटीपेक्षा अधिक वाढून रु. १८.२८ लाख कोटींपर्यंत पोहोचली. शिवाय जी कर्जमाफी झाली ती मनमोहन सिंग सरकारच्या काळात रु. ३२ हजार कोटी होती. ती २०१९-२० पर्यंत सध्याच्या सरकारच्या काळात २१ पटीने वाढून ६ लाख ८३ हजार कोटींपर्यंत पोहोचली.

**तक्ता क्र. - ४**


बँकांची अनर्जक परिसंपत्ती (NPA) व निर्लेखन स्थिती व प्रवृत्ती

(आकडे कोटी रु.)

| UPA (संपुआ) | | | NDA (रालोआ) | | |
|---|---|---|---|---|---|
| **वर्ष** | **सकल NPA** | **निर्लेखन** | **वर्ष** | **सकल NPA** | **निर्लेखन** |
| २००८-०९ | २४,०९४ | ० | २०१४-१५ | १,७७,८६० | ५०,९७८ |
| २००९-१० | ४४,८१७ | २,८९७ | २०१५-१६ | ३,८५,९६१ | ५९,४४४ |
| २०१०-११ | ५८,२२७ | ५,८८४ | २०१६-१७ | ३,२७,५९३ | ८१,९९० |
| २०११-१२ | ९३,१५२ | २,३४७ | २०१७-१८ | ४,८८,१७५ | १,२९,५०३ |
| २०१२-१३ | १,१९८११ | ७,१८७ | २०१८-१९ | २,१०,५३१ | १,८३,१६८ |
| २०१३-१४ | १,६३,९२० | १३,७९४ | २०१९-२० | २,३८,४६४ | १,७८,३०५ |
| **एकूण** | ५,०४,०२१ | ३२,१०९ | **एकूण** | १८,२८,५८४ | ६,८३,३८८ |

स्रोत : RBI data

**आलेख क्र. ३**



ही घटना वित्त व्यवस्थेचा हेतुपूर्वक ढिसाळपणा दर्शविते. ही थकीत कर्जे मोठ्या उद्योगांची असल्यामुळे लहान उद्योगांना वित्तपुरवठा करण्याची बँकांची क्षमता कमी झाली आणि त्यामुळेही अल्प-उत्पन्नधारक लोकांच्या व्यवसायावर, उत्पन्नावर आणि रोजगारावर विघातक परिणाम झाला. त्यात ग्रामीण अर्थव्यवस्थेवर अधिक प्रतिकूल परिणाम झाला हे उघडच आहे. भारतासारख्या देशात लोककल्याणाचे धोरण राबविताना शहरी आणि ग्रामीण व्यावसायिकांकडे दुर्लक्ष करणे हे उचित नसते; कारण ग्रामीण लोकसंख्या सुमारे ५५% व शहरी अल्प व मध्यम उत्पन्नाच्या लोकांचे प्रमाण सुमारे २०% असे मिळून देशाच्या सुमारे ७० ते ७५% लोकांवर प्रतिकूल परिणाम झाला असे म्हणता येते.

त्याचबरोबर आपापला पैसा बरोबर घेऊन सुमारे ५ लाख लोकांनी भारताचे नागरिकत्व सोडून विविध विदेशांचे नागरिकत्व पत्करले. यावरून समाजाचे एकूण नुकसान किती झाले याचा काहीसा अंदाज येऊ शकतो.

## ग्रामीण विकासाच्या अस्पष्ट कल्पना

सरकारने ग्रामीण औद्योगिक विकासासाठी काही प्रयत्न केले व त्याचे श्रेय सरकारला दिलेच पाहिजे. ग्रामीण विकासाच्या दृष्टीने सरकारने मुद्रा कर्ज योजना जाहीर केली आणि बँकांनी ती कर्जे मुबलक द्यावीत याचाही प्रयत्न केला. परंतु ग्रामीण पातळीपासून उद्योगांच्या संघटनाचे आणि विकासाचे नियोजन नसल्यामुळे त्यांचा सकारात्मक परिणाम ग्रामीण भागात दिसून आला नाही. बँकांवर ती कर्जे देण्याचा जो दबाव होता; त्यात बँक अधिकाऱ्यांचे म्हणणे असे होते की उघडपणे ही कर्जे परत येणार नाहीत, हे आम्हाला कळत असतानासुद्धा ठेवीदारांचा पैसा कर्जाऊ कसा द्यावा. आज ती बहुतांश मुद्रा कर्जे थकीत आणि बुडीत (NPA) झालेली आहेत आणि ह्या सरकारचा नियोजन पद्धतीलाच विरोध असल्यामुळे (त्यांनी योजना आयोगही बरखास्त केला) मुद्रा योजना चांगली असली तरी ग्रामीण पातळीवर त्यातून औद्योगिकीकरण उभे राहू शकले नाही. त्या स्थितीत ग्रामीण रोजगार आणि लोकांचे उत्पन्न हे खालच्या स्तरावरच राहिले. नियोजन केले गेले असते तर एकाच वेळी औद्योगिक तंत्रज्ञान, औद्योगिक कौशल्य, लहान उद्योग हे सगळे बँकांच्या कर्जामधून निर्माण झाले असते, पण ते होणे नव्हते.

## कोरोना काळ

कोरोनाची लागण परदेशात आणि देशातही २०१९ च्या शेवटी झाली होती. विविध राजकीय पक्षांनी सरकारचे त्याकडे लक्षही वेधले होते, परंतु

तत्कालीन अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भारतभेट २०२०च्या सुरुवातीला झाली. तथापि सरकारने कोरोनाच्या बाबतीतील सगळ्या घटना जणू काही झाकून ठेवल्या होत्या आणि ट्रम्पची भेट झाल्यानंतर २०२०-२१चा अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर लोकसभेचे अधिवेशन गुंडाळत सरकारने उद्योगांचे लॉकडाऊन सुरू केले. त्यामुळे शहरांमध्ये खेड्यातून आलेला मजूर वर्ग हवालदिल झाला आणि इतरत्र कुठे रोजगार मिळतो का हे पाहण्यासाठी शहरामध्ये राहिला. परंतु शहरांमधील कडक लॉकडाऊनमुळे कुठलाच रोजगार मिळणे शक्य नव्हते आणि खिशातील पैसाही संपत आलेला होता. म्हणून सरकारने जरी मजुरांनी थांबावे अशी इच्छा होती, तरी ती व्यर्थ होती; आणि हजारोंच्या संख्येने महानगरांमधून श्रमिक उत्तर प्रदेश, हरियाणा, राजस्थान, बिहार, ओरिसा, छत्तीसगड इत्यादी ठिकाणांकरिता परत निघाले. देशात बराच कल्लोळ झाल्यामुळे सरकारला सगळ्या मार्गांवर रेल्वे गाड्या पाठवाव्या लागल्या आणि मजूर मिळेल त्या वाहनाने (रेल्वे, ट्रक आणि पायी) जीव वाचविण्याकरिता आपापल्या खेड्यांकडे निघाले. विलक्षण बाब म्हणजे मजूर घराकडे जात असताना एक केंद्रीय मंत्री कलकत्त्यामध्ये उद्योजकांना सांगत होते की, तुम्ही तुमच्या मजुरांशी संपर्क करून त्यांना पुन्हा परत कामावर बोलवा आणि कारखाने सुरू करा.

भारताच्या ग्रामीण विकासात काय त्रुटी आहेत याचे चित्र मजूर आपआपल्या गावी गेल्यानंतर पाहावयास मिळाले कारण त्यांच्यासाठी राहण्याला जागा, रोजगाराची व्यवस्था, आरोग्य व्यवस्था, शिक्षणाच्या सुविधा इत्यादी बाबी अनेक राज्यांच्या ग्रामीण भागात उपलब्ध नसल्याचे स्पष्ट झाले. शहरांमध्ये तांत्रिक आणि कलाकुसरीच्या नोकऱ्या करणारे मजूर स्वत:च्या गावांमध्ये अतिशय कमी दरावर रोजगार हमीच्या कामावर जाऊ लागले. या घटनेने असे दाखवून दिले की, देशात आपण विकेंद्रित विकासाचा मुळीच विचार केला नाही; आणि मग अशा प्रकारच्या आपत्ती आल्या तर जनतेला वाऱ्यावर सोडले जाते. यावरून असे सिद्ध होते की आपण अशा आपत्ती येऊ शकतात, ह्याबद्दलचा काहीच धडा शिकलो नाही. ग्रामीण आवास, आरोग्य, शिक्षण आणि रोजगार यांच्याबद्दलची जी अनास्था चालू आहे, ती कोरोनामुळे पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे व आजही तशीच स्थिती आहे.

### कोरोना पश्चात- औद्योगिक सवलती

उत्पादन प्रेरक प्रोत्साहने (PLI) – कोरोना पश्चात उत्पादन व्यवस्था आणि रोजगार पुन्हा सुरळीत व्हावे म्हणून सरकारने उत्पादन प्रेरक प्रोत्साहनांची

योजना सुरू केली. मात्र परिस्थिती सुरळीत झाल्यानंतरसुद्धा, भारत २०२७ पर्यंत विकसित देश व्हायचा असेल व जगातील तिसऱ्या क्रमांकाची महाशक्ती व्हायचे असेल तर ही प्रोत्साहने बंद करू नयेत (विशेषत: सौर ऊर्जेच्या क्षेत्रात चालू ठेवावी.) असा उद्योजकांचा आग्रह आहे.

**उत्पन्न विषमता**

तसे पाहता विकासाच्या प्रक्रियेमध्ये नेहमीपेक्षा जास्त पैसा ओतला जातो; आणि तो पैसा विविध वस्तू, सेवा आणि व्यवस्थापन या कार्यामुळे जनतेत वितरित होतो. परंतु उद्योजक आणि व्यवस्थापक या वर्गांना तो भरमसाट मिळतो आणि मध्यम व कनिष्ठ वर्गांना त्याचा (झाल्यास) नाममात्र फायदा होतो. उत्पन्न वितरणाच्या अभ्यासामध्ये अर्थव्यवस्थेतील सर्वोच्च उत्पन्नाचा लोकसंख्येचा वरचा १०% चा गट त्याच्या खाली लोकसंख्येचा ४०% मध्यम वर्गीय गट व त्याखाली तळातील ५०% चा अल्प उत्पन्न श्रमिक गट असे वर्गीकरण मान्य झाले आहे. १९६० पासून, म्हणजे नियोजनाची प्रक्रिया सुरू झाल्यापासून ते १९९१-९२ पर्यंतचा काळ हा समाजवादी दृष्टिकोन असलेला काळ मानला जातो आणि १९९१-९२ पासून खासगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण यांचा काळ म्हटला जातो. भारताच्या आकडेवारीचे अभ्यास देशातील आणि विदेशातील अनेक तज्ज्ञांनी केले आहेत. सरकारचीच आकडेवारी असे दर्शविते की १९९१-९२ पर्यंत जरी विषमता वाढत होत्या तरी त्या मंद-गती होत्या आणि मध्यम व कनिष्ठ वर्गांनासुद्धा वाढत्या राष्ट्रीय उत्पन्नाचा थोडा वाढता हिस्सा मिळत होता. परंतु १९९१-९२ पासून उद्योगांना भरपूर सवलती दिल्या गेल्या, उद्योग आणि श्रीमंत वर्ग यांच्यावरील कर कमी केले गेले, मजुरीचे दर वाढवण्याकडे सरकारचे दुर्लक्ष झाले, मोठ-मोठी कर्जे घेऊन खासगी क्षेत्राद्वारे विकासाचा महामार्ग मोकळा केला गेला. त्याचा परिणाम असा झाला की, निर्माण होणाऱ्या उत्पन्न विषमतांवर सरकारने सोयीस्कर दुर्लक्ष केले. आज २०२४ पर्यंत भारतातील उत्पन्न विषमता, दक्षिण आफ्रिका देश वगळल्यास सगळ्यात जास्त आहेत. म्हणजे साध्या भाषेत श्रीमंत हे अति-अति श्रीमंत होत आहेत आणि मध्यम व कनिष्ठ वर्गाचा वाढत्या राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा कमी होत आहे. 'The World Inequality Lab' या संस्थेच्या अहवालात या घटनेला ' Rising of the Billionaire Raj' म्हणजे 'अरबपतींच्या राज्याचा उदय' असे म्हटले आहे. ह्या संपूर्ण प्रक्रियेचे चित्रण दरवर्षी 'World Economic Forum' या संस्थेच्या वार्षिक संमेलनांमध्ये ऑक्सफॅम व इतर सामाजिक

संस्था यांच्याद्वारे केले जाते. ऑक्सफॅम इंडियाच्या भारतातील मुख्य कार्यपालन अधिकारी निशा अग्रवाल यांनी २१ जुलै २०२४ रोजी जे निवेदन प्रसारित केले ते पुढीलप्रमाणे आहे, ‘अरबपतियों की बढती संख्या अच्छी अर्थव्यवस्था का नहीं, खराब होती अर्थव्यवस्था का संकेत है। जो लोग कठीण परिश्रम करके देश के लिए भोजन उगा रहे है, इंफ्रास्ट्रक्चर का निर्माण कर रहे है, फैक्ट्रियों में काम कर रहे है, उन्हें अपने बच्चे की फीस भरने, दवा खरीदने और दो वक्त का खाना जुटाने में संघर्ष करना पड रहा है। अमीर-गरीब के बीच बढ़ती खाई लोकतंत्र को खोखला कर रही है और भ्रष्टाचार को बढ़ावा दे रही है।’

विषमतेतील हे बदल सोबतचा तक्ता क्र. ५ व आलेख क्र. ४ आणि ५ यामध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्र. - ५**


भारतातील उत्पन्न विषमता


| राष्ट्राच्या एकूण उत्पन्नात लोकसंख्येच्या विविध गटांचा प्रतिशत (%) हिस्सा १९६१-२०२० | | | | |
|---|---|---|---|---|
| वर्ष | अतिउच्च - १% | उच्च- १०% | मध्यम ४०% | तळातील ५०% |
| १९६१ | १३.० | ३७.२ | ४२.६ | २१.२ |
| १९७१ | ११.७ | ३४.४ | ४४.० | २२.८ |
| १९८१ | ६.९ | ३०.७ | ४७.१ | २३.५ |
| १९९१ | १०.४ | ३४.१ | ४४.९ | २२.२ |
| २००२ | १७.१ | ४२.१ | ३९.२ | १९.७ |
| २०१२ | २१.७ | ५५.० | ३०.५ | १५.१ |
| २०१९ | २१.७ | ५६.१ | २९.७ | १४.७ |

स्रोत : World Inequality Report, 2023

**आलेख क्र. ४**

राष्ट्राच्या एकूण उत्पन्नात लोकसंख्येच्या विविध गटांचा (%) हिस्सा




स्रोत : World Inequality Report, 2023

२०१४-२४ या काळात सरकारने वाढत्या उत्पन्न विषमता या विषयाकडे पूर्णच दुर्लक्ष केले असून, आजही सरकार भारतीय अर्थव्यवस्था उत्पन्न वाढीमध्ये २०३० सालापर्यंत कशी शक्तिमान बनेल आणि २०४७ पर्यंत भारत कसा विकसित देश होईल हेच सांगत आहे. दुर्दैवाने मोठ्या सरकारी व बिन-सरकारी संस्थासुद्धा याच मुद्द्याची री ओढत आहेत. मात्र सरकार २०३० वर्ष असो की २०४७ असो आम्ही उत्पन्न विषमता कमी करू व एक समतावादी समाज निर्माण करू असे म्हणताना दिसत नाही आहे.

वरील वाढत्या विषमतांचे चित्र काही महत्त्वाचे प्रश्न निर्माण करते-

१) सर्व जनतेच्या मालकीची असणारी संसाधने काही मोजकेच लोक आपल्या आधिपत्याखाली आणत असतील आणि इतर ९०% जनतेला (मध्यम आणि कनिष्ठ वर्ग) जर नुसतेच राबविले जाणार असेल तर लोक ते आनंदाने मान्य करतील असे आहे का?

२) ही संसाधने (जमिनी, पाण्याचे स्रोत, खनिजे, वने इत्यादी) लोकांच्या हातातून निसटली तर दूरपर्यंत पसरलेल्या ग्रामीण जनतेच्या विकासाचे काय होईल?

३) विकास म्हणजे बहुतांना वंचित ठेवून, त्यांचे नागरिक म्हणून हक्क बाधित करून केवळ उत्पादनाचे मूल्य वाढविणे असे आहे का? की जास्तीत जास्त लोकांजवळ संसाधने असणे आणि त्यांनी त्यांचे संवर्धन व उपयोग करणे; असे आपल्याला अपेक्षित नाही का?

४) वंचिततेमुळे भविष्यकाळाची अनिश्चितता, वर्तमानकालीन अस्थिरता; आणि जीवनातल्या आवास, शिक्षण, आरोग्य या मूलभूत गोष्टी दुष्प्राप्य होत जाणे हे लोकांना मान्य आहे का?

५) ९०% लोकांचा उत्पन्नातील हिस्सा जर आणखी कमी होत गेला तर त्यातून त्यांचा विकास न होणे, वंचितता वाढणे व एक नव्या प्रकारचा अस्थिर समाज निर्माण होणे असे नाही का? आणि

६) ह्या अस्थिरतेची प्राथमिक लक्षणे चोऱ्या, गुन्हेगारी, खून, महिलांवरील अत्याचार, सायबर गुन्हे इत्यादींमध्ये वाढ होऊन त्यातून येणाऱ्या भविष्यकाळाची चुणूक दिसत नाही का?

याचाच अर्थ न्यायव्यवस्था, नागरिक आणि अल्प-उत्पन्नधारक श्रमिकांच्या संघटना यांनी अधिक जोरकसपणे विषमतेच्या विरुद्ध आवाज उठविणे आणि उपाययोजना सुचविणे हे आवश्यक आहे. १९९१ पर्यंतचे विषमतेचे आकडे दर्शवितात की समाजाची आर्थिक धोरणे कितीही कमी प्रमाणात अमलात आणली गेली, तरी त्यांचा फायदा सर्वसामान्य लोकांना झालेला आहे. त्या समाजवादाची मागणी पुन्हा करणे व त्यासाठी संघर्ष करणे आवश्यक झाले आहे.

रिझर्व्ह बँक बुलेटिनच्या जून, २०२४च्या अंकात 'द स्टेट ऑफ द इकॉनॉमी' (अर्थव्यवस्थेची अवस्था) हा रिझर्व्ह बँकेतील अभ्यासकांचा लेख प्रकाशित झाला आहे. त्यात असे म्हटले आहे की, अन्नधान्याची भाववाढ ही आपण समजत होतो, त्याप्रमाणे अल्पकालीन नाही आणि ती लवकर आटोक्यात आणणेही शक्य होत नाही. त्यासंबंधी पुढील दोन मुद्दे महत्त्वाचे

आहेत -

१. हवामान बदलाच्या काळात धान्य उत्पादन कमालीचे अस्थिर बनत चालले आहे, त्यामुळे अन्न-धान्य भाववाढीचा प्रश्न हा दीर्घकाळाचा बनू शकतो. त्याची झळ सामान्य वर्गाला जास्त पोहोचते. भारतात उपोषण, कुपोषण आणि पोषक आहाराची अवस्था ही आधीच चिंताजनक असताना हवामान बदलामुळे धान्य महागाईचा प्रश्न बिकट होऊ शकतो. आणि

२. केंद्र शासनाने पुढील ५ वर्षांकरिता सुमारे ८० कोटी लोकांना मोफत धान्यपुरवठा केला जाईल असे जे म्हटले आहे ते सरकारने खरेच करून दाखविण्याची आवश्यकता आहे व त्याकरिता देशाच्या अर्थसंकल्पातील एक मोठा भाग अन्नपुरवठ्याच्या व्यवस्थेसाठी नियोजितपणे खर्च करावा लागेल. त्यात कुठल्याही प्रकारचा राजकारणाचा मागमूस असू नये हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**निर्गुंतवणुकीचे धोरण : सार्वजनिक क्षेत्रावरील आघात**

सध्याच्या सरकारचे एक प्रमुख आर्थिक धोरण म्हणजे सार्वजनिक क्षेत्रातील (नफ्यात असो की कर्जात) उद्योगांचे खासगीकरण करणे हे होय. उद्योग क्षेत्रात कोणत्याही विशिष्ट वस्तू आणि सेवेच्या संदर्भात एकापेक्षा जास्त पण मूठभर उत्पादक नियंत्रण करत असतील, तर त्या अवस्थेला अल्पाधिकार (Oligopoly) असे म्हटले जाते. आणि एकच उत्पादक असल्यास, त्याचेच नियंत्रण चालते म्हणून त्याला एकाधिकारी (Monopolists) असे म्हणतात. बाजार व्यवस्थेचा मूलभूत सिद्धांत असे म्हणतो की उत्पादन हे जास्तीत जास्त संस्थांमध्ये विकेंद्रित असावे व उद्योजकांमध्ये स्पर्धा असावी जेणे करून उपभोक्त्यांचे जास्त किमतींद्वारा शोषण होणार नाही. सार्वजनिक क्षेत्रात सरकारच्या नियंत्रणाखाली जरी अल्पाधिकारी, एकाधिकारी संस्था असल्या तरी त्यांचे किंमत निर्धारण सरकार व संसदेद्वारे नियंत्रित केले जाते म्हणून शोषणाचे भय राहत नाही. परंतु भारतात २०२४ पासूनच ७० वर्षांत जनतेच्या पैशातून जे सार्वजनिक उद्योग निर्माण केले गेले, त्यांच्या खासगीकरणाचे धोरण सरकारने अवलंबिले आणि सत्ताधारी पक्षाच्या विविध सामाजिक संस्था सरकारवर सारखा दबाव टाकत आहेत की तुम्ही सार्वजनिक उद्योगांचे अधिक वेगाने व पूर्णपणे खासगीकरण का करत नाही? वर म्हटल्याप्रमाणे सरकारी उद्योगांचे खासगीकरण केले तर ते उद्योग खासगी अल्पाधिकारी वा एकाधिकारी बनतील व तसे चित्र स्पष्ट दिसत आहे. देशाच्या विकासाच्या प्रक्रियेत लोकांकडील करांच्या द्वारे संरक्षण, उद्योग, रेल्वे, वीज

उत्पादन, औषधी उत्पादन, धातू उत्पादन, जल परिवहन, वायू परिवहन इत्यादी क्षेत्रांतील सरकारी भांडवल वेगाने कमी करत ते खासगी क्षेत्राला विकले जात आहे. हे सर्व मोठे उद्योग सार्वजनिक क्षेत्रामध्ये असताना त्यांचा समाजाला मुख्य फायदा असा होता की नफा मिळो अगर न मिळो उत्पादन वाढविणे, उत्पादनाचा दर्जा क्षमतेनुसार सगळ्यात चांगला ठेवणे आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे तेथे काम करणाऱ्या श्रमिकांना चांगल्या पगाराच्या व सुरक्षित भविष्याच्या नोकऱ्या देणे, त्यामुळे श्रमिकांच्या दृष्टीने पाहिल्यास जे सार्वजनिक उद्योग आहेत ते तसेच ठेवून जे खासगी उद्योग बँकांची कर्जे हेतुतः परत करीत नाहीत, अशांचेही राष्ट्रीयीकरण होणे महत्त्वाचे आहे. परंतु सरकारच्या विशिष्ट धोरणामुळे जनतेच्या ठेवीवर दिलेली बँकांची कर्जे बुडवूनसुद्धा खासगी कंपन्यांना सार्वजनिक उद्योग हस्तांतरित करण्याचे जे धोरण सुरू आहे, ते किती घातक आहे हे लक्षात घेणे आवश्यक आहे. उदा. देशातील (कच्छपासून बंगालपर्यंत) सगळी बंदरे एकाच कंपनीच्या मालकीत किंवा व्यवस्थापनात देणे, देशातील सगळी विमानतळे पुन्हा त्याच कंपनीच्या वर्चस्वात देणे, असे देशातील पाच-सात विशाल कंपन्यांबद्दल चालू आहे. हे धोरण बदलविण्याचा सरकारचा कुठल्याही प्रकारचा विचार नाही. उलट २०२४-२५च्या नियमित अंदाजपत्रकात सार्वजनिक क्षेत्रांच्या जवळ जेवढ्या खाणी आहेत त्या सगळ्या विकून पैसा गोळा करणे (monetization of public resources) सरकारचा मानस आहे. मात्र २०२४च्या लोकसभा निवडणुकीमध्ये सत्ताधारी पक्षाची जी केंद्रित शक्ती होती, ती कमी झाल्यामुळे सरकार काय करू शकेल! ते पाहणे उचित होईल, परंतु २०१४ ते २०२४ दशकातला सरकारच्या धोरणाचा हा महत्त्वाचा मुद्दा जनतेकरिता अतिशय घातक आहे आणि सरकारचे लोकसभेतील घसघशीत बहुमत त्यासाठी वापरले जात होते, हे देशाकरिता हानिकारक व चिंताजनक आहे. खासगी मोठे उद्योग नफा वाढविण्याकरिता सतत नवे तंत्र उपयोगात आणत असतात आणि त्याचा रोजगारावर विघातक परिणाम जनता अनुभवत आहे. म्हणून सार्वजनिक उद्योगांचे आणखी खासगीकरण झाले व खासगी कंपन्यांनी आणखी नवे तंत्र उपयोगात आणले, तर केवळ नवीन रोजगार वाढच मंद होईल असे नव्हे तर असलेला रोजगारही कमी होण्याचा धोका आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेचा ज्या प्रमाणात उदय व प्रसार होत आहे, ते पाहून उत्पादन कार्याची स्वयंचलितता झपाट्याने वाढून रोजगारावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता अनेक अभ्यासकांनी आणि कॅथोलिक संप्रदायाचे धर्मगुरू पोप यांच्यासह अनेकांनी व्यक्त केली आहे. *(पाहा- मिलिंद कीर्ती:*

*कृत्रिम बुद्धिमत्तेचे मायाजाल युग : सहमतीची हुकूमशाही- अरिस्टोक्रसी टू टेक्नोक्रसी, लोकवाङ्मय गृह, मुंबई ऑगस्ट, २०२३)*

**शेतमालाच्या आधारभूत किमती**

गेल्या दहा वर्षांमध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी न होणे ग्रामीण उद्योग व रोजगार न निर्माण होणे यांच्यामागे उपस्थित असलेला महत्त्वाचा मुद्दा म्हणजे शेतमालाला किमान आधारभूत किमती न मिळणे. सर्वांना माहीतच आहे की देशात किमान आधारभूत किमतींचा कायदा करण्यासाठी उत्तर भारतातील शेतकरी मोठ्या प्रमाणावर आंदोलन करीत आहेत. किमान आधारभूत किमती या केंद्र सरकारच्या अखत्यारीत येत असल्यामुळे त्या सर्व शेतकऱ्यांच्या आंदोलनाचे केंद्र दिल्ली राजधानी हे आहे. मध्य, दक्षिण व पूर्व राज्यांमधील शेतकरी त्या संघर्षाच्या केंद्रात जाऊन मागणीचे समर्थन करीत आहेत. या प्रश्नाबाबत केंद्र सरकारची भूमिका आतापर्यंत फारच गोंधळाची राहिलेली आहे. सरकारने आतापर्यंत त्या प्रश्नावर शेतकऱ्यांशी चर्चा करण्याचे नाकारले आहे आणि शेतकरी दिल्लीत येऊन सरकारशी बोलणी करण्यासाठी शक्तिप्रदर्शन करीत आहेत. परंतु सरकारने पंजाब, हरियाणापासून शेतकऱ्यांचे दिल्लीत येण्याचे विविध मार्ग रस्ते खोदून, खिळे ठोकून बंद करण्याचा प्रयत्न केला आहे. जुलै २०२३च्या तिसऱ्या आठवड्यामध्ये हरियाणा उच्च न्यायालयाने सरकारला रस्ते बंद करण्याचा अधिकार नाही, अशी भूमिका घेतली आहे. सरकारने असे सांगण्याचा प्रयत्न केला आहे की देशात किमान आधारभूत किमती होत्या, आहेत आणि राहतील. शेतकऱ्यांच्या संघटनांचे म्हणणे असे आहे की, सरकारने तसा कायदा करावा. आश्चर्याची बाब म्हणजे शेतकरी आधारभूत किमतीसाठी लढताहेत, त्यापेक्षा किफायतशीर किमतीसाठी लढत नाहीत. सरकारचे म्हणणे आहे की, तुम्ही खरेदीदारांशी करार करा आणि तो करार बाजाराच्या तत्त्वाप्रमाणे असला पाहिजे. प्रश्न असा आहे की, पाश्चिमात्य जगात बहुतेक सर्व देशांमध्ये लोकसंख्या मर्यादित आहे आणि शेतजमीन भरपूर उपलब्ध आहे; त्याचा परिणाम म्हणून धान्य, फळे, पशू-उत्पादने इतके जास्त होतात की त्याची निर्यात केल्याशिवाय तेथील शेतकरी जगू शकत नाही. शेतकऱ्यांचे प्रमाणसुद्धा इतके अल्प आहे की तेही जर शेती सोडून कारखाना मजूर झाले तर तेथे शेती कोणी करावी हा प्रश्न निर्माण होईल. म्हणून तेथील शेतकऱ्यांना बाजारभावाला हात न लावता इतकी भरमसाट अनुदाने दिली जातात की त्या आधारावर ते शेतकरी प्रत्यक्ष उत्पादन खर्चापेक्षाही कमी किमतीला माल विकू

शकतात आणि त्या किमती जागतिक किमती म्हणून इतर देशातील कृषी किमतीला खाली ढकलतात. परिणामी कमी जमीन आणि जास्त लोकसंख्या असलेल्या देशांमधले शेतकरी तेवढ्या कमी किमतीला आपले उत्पादन विकू शकत नाही, त्यामुळे शेतीची उत्पादकता कमी असणे, शेतकरी आणि शेतमजूर गरीब, बेरोजगार व कर्जबाजारी असणे, शेतीत गुंतवणूक कमी होणे इत्यादी परिणाम दिसत आहेत. उत्तर भारतात देशातील मोठ्या अन्न-धान्य विक्रेत्या कंपन्यांनी प्रचंड मोठी वातानुकूलित गोदामे बांधली असल्यामुळे शेतकऱ्यांना अशी भीती निर्माण झाली आहे की त्या कंपन्या स्वस्तात धान्य खरेदी करतील आणि महागात विकून नफाखोरी करतील. धान्य खरेदीच्या वेळी मागील वर्षी साठवलेले धान्य बाजारात विकतील, बाजारातील किमती पाडतील आणि त्या पडलेल्या किमतींना बाजारभाव म्हणून नवे धान्य विकत घेतील. त्यामुळे शेतकऱ्यांची खात्री अशी झाली आहे की, सरकार अन्न-धान्याचा सगळा व्यापार मोठ्या औद्योगिक कंपन्यांच्या हाती देत आहे. म्हणून एकीकडे शेतकरी वर्ग, दुसरीकडे भांडवलदार वर्ग आणि तिसरीकडे सरकार असा हा संघर्ष चालू आहे. २०२४च्या लोकसभा निवडणुकांमध्येसुद्धा सत्ताधारी पक्षाने या मुद्द्यावर कोणतीच भूमिका घेतली नसल्यामुळे गेल्या दहा वर्षांत शेतकरी विरुद्ध सरकार हा संघर्ष चालू आहे. भांडवलदार वर्ग हा धान्य खरेदीत उतरल्यामुळे या प्रश्नाला वर्गसंघर्षाचे स्वरूप आले आहे. निराश व नाराज होत असलेल्या शेतकऱ्यांनी ती नवी गोदामे तोडण्याच्याही धमक्या दिल्या आहेत. दहा वर्षांच्या काळात सरकारने या प्रश्नावर सर्वमान्य असा तोडगा न काढल्याने सरकारलाही निवडणुकांमध्ये शेतकऱ्याची नाराजी सहन करावी लागली आहे. म्हणून २०२४-२५ पासून सुरू होणाऱ्या सत्ताधारी गठबंधनाच्या तिसऱ्या काळात तरी हा प्रश्न सुटणार आहे का अशी शंका येते. प्रत्यक्ष व्यवहारात पाणी-पुरी विकणारा, फळे, भाज्या इत्यादी विकणारा वर्गसुद्धा किमान नफा मिळाल्याशिवाय धंदा करू शकत नाही तर मग शेतकऱ्यांनी किमान भाव न मिळाले तरी शेती उत्पादन चालू ठेवावे असे आपण म्हणणार काय? शेतकरी गरीब राहिला म्हणजे शेतमजूर व ग्रामीण भागातील अन्य कारागीर व इतर जनतासुद्धा गरीब राहील. सुमारे ५५% जनता अवलंबून असणाऱ्या शेती क्षेत्राला सरकारने गेल्या दहा वर्षांत न्याय दिला नाही याचे दु:ख शेतकरी वर्गाला मोठ्या प्रमाणावर आहे.

**केवळ उत्पादन वाढीवर भर**

आज जगभरातील विविध देश भांडवलशाही व्यवस्थेंतर्गत विकासासाठी

प्रयत्न करत आहेत. त्यामध्ये भारत हा आघाडीवर असून २०४७ पर्यंत विकसित होऊन महासत्ता बनण्याची अभिलाषा बाळगून आहे आणि महासत्ता बनण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जी विकासाची नीती अवलंबण्यात आली आहे; त्यात प्रामुख्याने केवळ उत्पादन वाढीवर भर आहे. २०१४-१५ पासून सादर झालेल्या विविध अर्थसंकल्पातील खर्चाच्या प्रवृत्ती पाहिल्यास प्रस्तुत सरकारची विकास नीतीदेखील हीच राहिली असल्याचे स्पष्ट होते. देशाच्या सकल उत्पादनाचा वेग वाढवण्याकरिता सरकार भौतिक पायाभूत सुविधांवर (ज्यामध्ये रस्ते, रेल्वे, मेट्रो, बंदरे, हवाई-वाहतूक, वीजनिर्मिती, इत्यादींवर) प्रचंड खर्च करत आहे. पायाभूत सुविधांवरील खर्च हा विकासाकरिता निश्चितच आवश्यक असतो, परंतु तो करत असताना परत शहरी क्षेत्रालाच प्राधान्य दिले जात असून ग्रामीण क्षेत्राकडे मात्र दुर्लक्ष होताना दिसते आहे. शिवाय आज मानव विकासाच्या स्वरूपात विकासाची पर्यायी परिभाषा (जी मानवाला विकास प्रक्रियेचा केंद्रबिंदू मानते.) जगमान्य झालेली असताना; रस्ते, वीज, वाहतूक यांसारख्या भौतिक पायाभूत सुविधांमधील गुंतवणुकीप्रमाणेच शिक्षण, आरोग्य-सुविधा, पोषण, कौशल्य-विकास यांसारख्या मानवी भांडवलात गुंतवणूक करणेदेखील तितकेच किंबहुना भारतासारख्या देशात त्यापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे.

जगभरात आज 'मानव विकास निर्देशांक' हा विकासाचा सूचक म्हणून मान्यताप्राप्त झाला आहे. त्यादृष्टीने मानव विकास निर्देशांकाचा विचार केल्यास २०२२ मध्ये भारताचा क्रमांक जगातील १९३ देशांमध्ये १३४ व्या स्थानी येतो. मानव विकासाच्या बाबतीत इतकी दारुण अवस्था असतानादेखील मानवी भांडवलातील गुंतवणुकीला कुठलेही प्राधान्य दिलेले दिसत नाही. याशिवाय ग्रामीण व शहरी क्षेत्रातील कामकरी महिलांच्या शिक्षण, आरोग्य व सक्षमीकरणाच्या बाबतीत सरकारची कमालीची अनास्था व दुर्लक्ष असल्याचे दिसून येते. ही केवळ टीका नसून वस्तुस्थिती आहे. भांडवलशाहीतील उत्पादन वाढीच्या या शर्यतीत पर्यावरणाची प्रचंड हानी होत असून, मनुष्य या उत्पादनकेंद्रित प्रक्रियेचा बटिक बनून राहिलेला असल्याचे चित्र आज भारतासह सर्वदूर पाहावयास मिळत आहे. त्यामुळे अशा स्थितीत आज आपण असताना साहजिकच भविष्यातील विकासाची दिशा काय असावी, असा प्रश्न निर्माण होतो.

❖ ❖ ❖

५

# समारोप

**समाजवादच का?**

भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये गेल्या दोनशे-अडीचशे वर्षांमध्ये जेवढा काही तंत्रज्ञानाचा विकास झाला तो अचंबा करण्याइतका चांगला होता व आहे. परंतु तांत्रिक विकासाच्या प्रत्येक फेरीने श्रमिकांना उत्पादन प्रक्रियेतून मोठ्या प्रमाणावर बाहेर फेकले व दुसऱ्या बाजूने औद्योगिक नफा वाढतच राहिला. म्हणून २१व्या शतकाच्या तिसऱ्या दशकात विचार करताना असा प्रश्न निर्माण होतो की, भांडवलशाही स्वत:चेही प्रश्न सोडवू शकत नाही आणि तिने समाजाकरिता निर्माण केलेले प्रश्नही (बेरोजगारी, आवास, शिक्षण, आरोग्य इ.) सोडवू शकत नाही तर समाजाचे भवितव्य काय? जर तांत्रिक उत्पादन व्यवस्था स्वत:ला 'औद्योगिक लोकशाही' (Industrial democracy) म्हणवून घेत आहे, तर या लोकशाहीमध्ये लोकांचे अधिकार फक्त मतदानापुरतेच मर्यादित आहेत का? देशातील उत्पादन साधनांचा आणि त्यापासून निर्माण होणाऱ्या राष्ट्रीय उत्पन्नाचा न्याय हिस्सा जनतेला मिळावा की नाही? असा प्रश्न सगळीकडे विचारला जात आहे. भांडवलशाहीच्या जलदगती विकासानेच जल-वायू-माती प्रदूषण करून हवामान बदलाचा प्रश्न निर्माण केला आहे. तो सोडवताना असे दाखविले जाते की जी श्रीमंत राष्ट्रे आहेत, ती आवश्यक खर्चाचा मोठा हिस्सा उचलतील; परंतु जगभर अशीच चर्चा चालू आहे की हे सर्व दाखविण्यापुरतेच आहे. प्रत्यक्षात मात्र श्रीमंत राष्ट्रे वेगवेगळ्या युक्त्या काढून आपले ओझे झटकू पाहत आहेत. अमेरिकेत नोव्हेंबर २०२४ मध्ये होणाऱ्या निवडणुकांमध्ये राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून येऊ घातलेले डोनाल्ड ट्रम्प तर असा काही प्रश्नच नाही, अशी भूमिका घेत आहेत. परंतु पर्जन्यवृष्टीमधील सततची अनिश्चितता वाढल्यामुळे

सगळ्याच देशांमध्ये शेती विकासाचा प्रश्न तीव्र झाला आहे. त्याचबरोबर प्रदूषणामुळे निर्माण होणारे आरोग्याचे प्रश्न सरकारांच्या क्षमतेपलीकडे जात आहेत राजसत्ता ही प्रत्यक्षात उच्च उत्पन्नधारक लोकांच्या हाती केंद्रित होत आहे वंचिततेमुळे देशादेशांची आपसात युद्धे होत आहेत आणि तरीही एकमेकांच्या स्पर्धेत, खनिजांच्या शोधात सगळे देश अंतराळ संशोधनावर वाढता खर्च करून वेगवेगळ्या ग्रहांवर जाण्याची स्पर्धा करीत आहेत. त्याहून सखोल दृष्टीने पाहिल्यास एक प्रकारचा अविश्वास, असूया, वाढती गुन्हेगारी, असमाधान, हतबलता इत्यादींनी देश गांजलेले आढळतात. याला भांडवलशाहीचे यश म्हणायचे का? आणि ते केवळ वस्तूचे यंत्रांच्या आधारावर वाढलेले उत्पादन×त्यांच्या किमती = वाढणारे राष्ट्रीय उत्पन्न आणि त्यातून महाशक्ती होण्याचे प्रत्येकाचे प्रयत्न हे मानवजातीचे कल्याण म्हणावे का?

एका अमेरिकन अर्थशास्त्रज्ञाने अमेरिकेतील भविष्यातील प्रश्न त्याच्या अर्ध्या पुस्तकात वर्णन केले आणि ते सोडविण्यासाठी उरलेले पुस्तक हे बुद्धाचे तत्त्वज्ञान आणि समाजवाद यांच्या आवश्यकतेचे प्रतिपादन करण्यासाठी खर्च केले. त्यांचे साधे म्हणणे एवढेच की आपण अवाढव्य गरजा निर्माण केल्या, तर त्या पूर्ण करण्यासाठी संसाधनेही अवाढव्यच लागतील. म्हणून गरजा मर्यादित ठेवणे हा त्यावर महत्त्वाचा उपाय आहे. त्यांनी असे म्हटले की, मी अर्थतज्ज्ञ म्हणून सल्ला देण्यासाठी भूतानमध्ये गेलो मात्र मला स्वत:लाच तिथे खूप काही शिकावयास मिळाले. याला आपण बुद्ध विचार, मार्क्स विचार किंवा सगळे मिळून एक विचार असेही म्हणू शकतो.

भारताच्या संविधान परिषदेमध्ये विविध जाती-धर्माच्या २९६ प्रतिनिधींपैकी २११ काँग्रेसचे होते, ७३ मुस्लीम लीगचे होते आणि बाकी जागा भरू शकल्या गेल्या नाहीत. या परिषदेने सुमारे डिसेंबर १९४६ पासून नोव्हेंबर १९४९ पर्यंत कार्य करून संविधान तयार व पारित केले. या संविधानाच्या चौथ्या भागांत राज्याच्या धोरणांची निर्देशक तत्त्वे (Directive Principles of State Policy) यामध्ये अनुच्छेद ३९-ब आणि क मध्ये देशातील भौतिक संसाधनांची मालकी आणि नियंत्रण सगळ्यांच्या हिताकरिता विकेंद्रित केले जातील आणि अर्थव्यवस्थेमध्ये संपत्ती आणि उत्पादनाची साधने ही बहुतांश लोकांच्या हिताविरुद्ध केंद्रित होणार नाहीत याची काळजी घ्यावी असे म्हटले आहे. आपण वर घेतलेला आढावा जर असे दर्शवितो की, गेल्या दहा वर्षांत उत्पादन साधनांचेही केंद्रीकरण झाले आहे आणि संपत्तीचेही केंद्रीकरण झाले आहे तर मग दहा वर्षांत सरकारने संविधानातील निर्देशक तत्त्वांचे काय केले? असा प्रश्न निर्माण होतो. म्हणून आजचा प्रश्न एकीकडे देशाच्या

संविधानातील विकेंद्रीकरणात्मक निर्देशक तत्त्वे, तर दुसरीकडे झपाट्याने उत्पादन साधनांच्या मालकीचे होणारे नियंत्रण आणि राष्ट्रातील उत्पन्न व संपत्तीचे केंद्रीकरण हे संविधान निर्माण करणाऱ्या आपल्या मागील पिढीच्या विचार आणि अपेक्षेपेक्षा विपरीत आहे, असे म्हणावे लागेल. ती निर्देशक तत्त्वे समाजवादाचीच आहेत हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे. जर संविधानातील न्यायाची तत्त्वे आम्हाला मान्य असतील व आम्ही त्यांना बांधील असू, तर निश्चितच बेलगाम भांडवलशाहीला नवे वळण देऊन तिच्या ऐवजी कालसंगत अशा समाजवादाकडे झुकणारी अर्थ व राज्य व्यवस्था आपल्याला निर्माण करावी लागेल. त्यात आपण जितके अपयशी होऊ तितका सामान्य माणूस डोळ्याला पट्टी बांधलेल्या भांडवलशाहीमध्ये भरडला जाईल हे निश्चित!

❖ ❖ ❖

**लोक असेही म्हणतात की ...**

मागील १० वर्षात राजकीय आणि आर्थिक ह्या दोन्ही आघाड्यांवर सरकारची धोरणे लोकांसाठी आणि देशांसाठीही हानिकारक आहेत... राजकीय लोकशाही व समाजवादी आर्थिक धोरणांची अवनती झाल्यामुळे... आपण अनेक वर्षे मागे गेलो आहोत...

* * *

कोरोनाचे प्रशासन, उत्पादन व्यवस्था आणि श्रमिकांची दुर्दशा ह्या दृष्टीने २०२०-२१ व २०२१-२२ या काळाकडे पाहिल्यास अंगावर काटा उभा राहतो...

सरकारने सक्रिय झाल्याबरोबर बेमुदत कारखाने बंदी सुरु केली. त्यामुळे मजुरांच्या पुढे प्रश्न आला की शहरांमध्ये कुठल्याच प्रकारचा रोजगार उपलब्ध नव्हताच आणि होणारही नव्हता, मग शहरांमध्ये थांबण्याऐवजी आप्त लोकांमध्ये राहणे उचित म्हणून शहरांमधील स्थलांतरित श्रमिक मिळतील त्या वाहनांनी खेड्यांकडे निघाले...

...खेड्यांमधील दुर्लक्षित आवास, आरोग्य, शिक्षण ह्या सगळ्यांकडे झालेले दुर्लक्ष एकदम उघडे पडले. ह्या उदाहरणाने ग्रामीण विकासातील त्रुटी एकदम लक्षात आल्या...

* * *

राज्यसत्ता ही भांडवलदाराला पूरक अशी आर्थिक धोरणे बनवीत असल्यामुळे ज्याच्या श्रमावर हा देश फुलला, बहरला, फळाला आला त्याच्या श्रमाला हे सरकार महत्त्व देत असल्याचे दिसत नाही...

* * *

८५ टक्के गरिबीचा संबंध हा जमिनीशी जोडलेला आहे. देशातील नैसर्गिक संसाधनांवरील मालकी हक्काच्या विषम वाटणीमुळे जातिभेदातील वर्गसमूह, लिंगभेदातील महिला वर्ग व त्यातही एकल महिला ह्या जास्त गरिबीत आहेत...

* * *

## अमेरिकेतील मंदीच्या भीतीने भांडवली बाजारांची गाळण

# सेन्सेक्स, निफ्टीची दाणादाण




## जागतिक बाजारातील पडझडीपायी...

अमेरिका आणि जर्मनीत मंदीचे वारे,
चीनच्या बाजारात हाहाकार,
भारताचा तर रेकॉर्ड वर रेकॉर्ड

# 'सेन्सेक्स'ची ८८५ अंश गटांगळी

## गुंतवणूकदारांना ४.४६ लाख कोटींची झळ




गुंतवणूकदारांना सेन्सेक्स पावला;
सोमवारच्या धक्क्यानंतर
दिला मदतीचा हात;
मागोमाग निफ्टीचाही पुढाकार!

## सलग दुसऱ्या दिवशी शेअर बाजाराची भरपाई,
## गुंतवणूकदारांचा ६ लाख कोटींचा फायदा!

जागतिक स्तरावरील
भागविक्रीच्या माऱ्याचा परिणाम



दिवंगत कॉ. दादा पुरव हे दूरदृष्टी असलेले नेते होते. सर्व कष्टकरी समाजाच्या प्रगतीसाठी वचनबद्ध असलेले नेते. त्यांनी विद्यार्थीदशेत असतानाच भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेतला. पुढे त्यांनी त्यांची पत्नी पद्मश्री प्रेमाताई ह्यांच्यासह गोवा मुक्तीसंग्रामात भाग घेतला. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, ते साम्यवादी चळवळीत सहभागी झाले. आणि त्यांना याची जाणीव झाली की आर्थिक स्वातंत्र्यापासून वंचित राजकीय स्वातंत्र्य विशेषत: सामान्य जनतेसाठी निरर्थक आहे.

त्यामुळे, त्यांनी बँक कर्मचाऱ्यांना संघटित करण्यासाठी, तसेच मुंबईमधल्या वस्त्रोद्योग कामगारांसाठी स्वत:चे आयुष्य वाहून घेतले. केवळ ५४ वर्षांचे अल्पायुष्य त्यांना लाभले. तरीही, इतक्या कमी कार्यकाळात एक कुशल ट्रेड युनियन नेता म्हणून त्यांनी आदराचे स्थान मिळवले. त्यांनी भारतातील सर्वात मोठी बँक कर्मचारी संघटना (AIBEA) मध्ये राष्ट्रीय पातळीवर नेतृत्व केले. तसेच गिरणी कामगारांच्या संघटनेत ही महत्त्वाचे योगदान दिले. ते कम्युनिस्ट पक्षाचे सदस्य आणि महत्त्वाचे नेते होते. १९८२ मध्ये दादा पुरव यांचे दु:खद आणि अकाली निधन झाले. त्या नंतर अन्नपूर्णा परिवाराच्या विश्वस्तांनी विचार केला की, कॉ. दादा पुरव ह्यांचे यथोचित स्मारक व्हावे. परंतु बराच काळ ह्यावर प्रत्यक्ष कृती घडली नाही. कालांतराने अखेर १८ ऑगस्ट २००८ रोजी त्यांच्या २६व्या पुण्यतिथीला पुण्यामध्ये, ‘दादा पुरव रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिटयुट’ची स्थापन करण्यात आली. इंडियन ओव्हरसिज बँकेने अन्नपूर्णा परिवाराला दिलेल्या अनुदानाचा एक भाग ह्या इन्स्टिटयूटच्या उभारणीसाठी वापरला गेला.

‘दादा पुरव रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिटयुट’ हे कॉ. दादा पुरव यांच्या नावाचे एक संशोधन केंद्र आहे. येथे गरिबांवर परिणाम करणाऱ्या आर्थिक विषयाचा अभ्यास केला जातो. तरुणपिढी समोरील आव्हाने आणि महिलांचे हक्क हे कॉ. दादा पुरव यांचे विशेष आवडीचे विषय होते. त्यामुळे या रिसर्च सेंटर तर्फे तरुणांना आणि महिलांना प्रेरणा देण्यासाठी व्याख्याने आणि कार्यक्रम असे उपक्रम राबवले जातात. ह्या शिवाय विविध शिक्षण संस्थांमधील पोस्ट ग्रॅज्युएशनचे विद्यार्थी अन्नपूर्णा परिवारामधील मायक्रो फायनान्स, मायक्रो इन्शुरन्स, सामाजिक उद्योजकता, महिला सक्षमीकरण ह्या विषयांवर जे कामकाज चालते त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी येतात. ह्यामध्ये भारतातील प्रसिद्ध शिक्षणसंस्था आहेत, तशाच परदेशी शिक्षणसंस्था देखील आहेत. प्रख्यात विद्वान, दिग्गज ट्रेड युनियनिस्ट आणि संशोधक ह्या रिसर्च सेंटरच्या व्यवस्थापन टीममध्ये आहेत.

**दादा पुरव रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्युटचा उपक्रम**

दादा पुरव रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्युटतर्फे विद्यार्थ्यांना

१) मायक्रो फायनान्स

२) मायक्रो इन्शुरन्स,

३) सामाजिक उद्योजकता

४) महिला सक्षमीकरण

या विषयावरील ट्रेनिंग व संशोधन करण्यासाठी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

ह्या संस्थेमधून फील्डवरील कामाचा अनुभव आणि संशोधनासाठी

१) कर्वे समाजसेवा संस्था

२) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ

३) भारती विद्यापीठ

४) नरसी मोनजी इन्स्टिटयूट

५) गोखले इन्स्टिटयूट

६) आय.आय.एम

अशा अनेक नामांकित शिक्षण संस्थामधून तसेच फ्रान्स आणि अमेरिकेसारख्या देशातून पोस्ट ग्रॅज्युएशनचे विद्यार्थी येतात. तसेच, अन्नपूर्णा परिवार अंतर्गत ‘संवाद’ या गृह मासिकाचे दर तिमाहीला प्रकाशन केले जाते. आणि मोजक्याच परंतु प्रत्यक्ष संशोधन व डाटावर आधारित दर्जेदार पुस्तकांची निर्मितीसुद्धा या संस्थेतून केली जाते.

## अन्नपूर्णा परिवार - संक्षिप्त माहिती

महिला सक्षमीकरणासाठी १९९३ मध्ये स्थापन झालेला "अन्नपूर्णा परिवार" गेली ३१ वर्ष, पुणे आणि मुंबई येथील गरीब महिलांच्या कुटुंबाच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी कार्यरत आहे.

११ जुलै १९९३ रोजी डॉ. मेधा पुरव - सामंत यांनी स्वत:च्या घराच्या जिन्या खालील ८*८ च्या खोलीतून पुण्यातील ९ भाजीवाल्या महिलांना पहिले कर्ज देऊन "अन्नपूर्णा परिवार" ची सुरुवात केली. पुढील १० वर्षात त्यांनी ह्याच गरीब महिलांच्या गरजांवर आधारित लघु कर्ज, लघु बचत, लघु विमा, मुलांसाठी पाळणाघरे, शिष्यवृत्ती आणि लघु पेन्शन अशा प्रकारे कार्याचा विस्तार केला. शिवाय मुंबई येथील झोपडपट्ट्यांमध्ये ही २००३ पासून हे सर्व कार्य सुरू केले. अन्नपूर्णा परिवारात ६ भगिनी संस्था निर्माण केल्या. त्यांच्या अंतर्गत खालील उपक्रम राबविण्यात येतात.

### अन्नपूर्णा परिवाराचे महिला सक्षमीकरणासाठीचे उपक्रम :

१. नागरी वस्त्यांमध्ये गरिबांसाठी मुख्यत्वेकरून महिलांच्या सक्षमीकरणासाठी, त्यांना विनातारण छोटी कर्ज देणे व बचतीची सुविधा उपलब्ध करून देणे. हे काम पुण्यातील सर्व म्हणजेच ६५० झोपडपट्ट्यात तर मुंबईतील १२०० झोपडपट्ट्यांमध्ये चालू आहे. आज अन्नपूर्णा महिला को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे १,२५,००० सभासद आहेत. फ्रांचाइजी तत्वावर महाराष्ट्रात इतर ठिकाणी ही हे काम सुरू केले.
२. सामूहिक तत्वावर आरोग्यविमा, जीवनविमा, कुटुंबविमा व मालमत्ता हानी विमा.
३. आधारपूर्णा ही कर्जदार सभासदांसाठी म्हातारपणासाठीची पेन्शन देणारी बचत योजना.
४. पुण्यातील आणि मुंबईतील काही झोपडपट्ट्यांमध्ये कमी शुल्क घेणारी पाळणाघरे चालवली जातात. याचा लाभ घरकाम, स्वयंपाक, भाजी विक्री करणाऱ्या झोपडपट्टीतील गरीब महिलांना होतो. सध्या १० पाळणाघरांमध्ये ३५० मुलांचा सांभाळ केला जात आहे. दररोज ८ तास १ ते ६ वयोगटातील मुलांना या पाळणाघरात ठेवता येते.
५. झोपडपट्टीतील परित्यक्ता व विधवा महिलांच्या मुलांना शैक्षणिक शिष्यवृत्ती देणे. दरवर्षी साधारण १००० मुलांना या शैक्षणिक शिष्यवृत्तीचा लाभ दिला जात आहे.
६. संस्थेच्या "दादा पुरव रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट" तर्फे "संवाद" या मासिकाचे दर तिमाहीला प्रकाशन केले जाते व मायक्रो फायनान्स, मायक्रो इन्शुरन्स विषयांशी संबंधित पुस्तकांची निर्मिती आणि या विषयांवरील संशोधन करण्यात येते. या संस्थेतून विद्यार्थ्यांना ट्रेनिंग व संशोधन करण्यासाठी सुविधा उपलब्ध आहेत.
७. अन्नपूर्णा परिवार समुहामध्ये "पूर्णा ई-सोल्युशन्स फाउंडेशन" ही एक सॉफ्टवेअर कंपनी सुध्दा आहे. ह्यात १२ महिला सॉफ्टवेअर इंजिनीअर्स आहेत. त्या अन्नपूर्णा परिवारासाठी सॉफ्टवेअर लिहितात व मेन्टेन करतात.

संस्थेचे मुख्य कार्यालय वारजे, पुणे येथे असून पुण्यातील ६५० वस्त्यांसाठी १२ व मुंबईत १२०० वस्त्यांसाठी १० शाखा कार्यालये आहेत. मुंबईत क्षेत्रीय कार्यालय वाशी येथे आहे. संस्थेत जवळजवळ ३५० कर्मचारी असून त्यात ९५% महिला आहेत.

आजमितीला अन्नपूर्णा परिवारात ६ स्वतंत्र संस्था कार्यरत असून विविध प्रकल्पांच्या माध्यमातून शहरी गरीब कुटुंबाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी झटत आहेत.

अधिक माहितीसाठी वेबसाईट - ***www.annapurnapariwar.org***



**दादा पुरव रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट**
**: तर्फे प्रकाशित**